# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price Rs. 3/-

Vol - 3

Issue - 4

October - 2010

ऑक्टोबर-२०१०

# संवाद

|| स्वयमेव मृगेंद्रता ||

मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ॥
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ॥

## दिवाळी विशेषांक




**बुक ॲडजस्टमेंट**

अहो, हा 'संवाद' उघडा. त्यातले 'संपादकीय' वाचा म्हणजे अंगातील आळस जाईल आणि उरलेले आयुष्य सार्थकी लागेल. नुसते 'इन-ऑपरेटिव्ह' राहिलात तर 'डेडस्टॉक' ला टाकेन.

- एम.डी.पालकर, पुणे.

Visit us at : www.sbipensionerspune.org / E-mail : sbipenmumbai@yahoo.com


October 2010 SAMVAD
१ डिसेंबर २०१० ते ३१ मे २०११ पर्यंतच्या सहली
अंबाजोगाई
सोबत परळी वैजनाथ
सहल खर्च रु.१८००/-
प्रत्येक सोमवार ते रविवार रोज
क्रांतिवीरांचे बलिदान
पहायलाच हवे
अंदमान
५ रात्र ६ दिवस पाँडेचेरी
रुपये:११,०००/-फक्त
विमान भाडे अधिक
मुंबई ते पोर्टब्लेअर व परत विमान प्रवास
प्रत्येक मंगळवार ते रविवार
Shilong
चेरापुंजी काझीरंगा
६ रात्र ७ दिवसाची सहल
Rs:18,500/-
विमान भाडे अधिक
प्रत्येक सोमवार ते रविवार
चिखलदरा मेळघाट
अमरावती
प्रत्येक गुरुवार ते रविवार
३ रात्र ४ दिवसाची सहल
मुंबई ते अमरावती रेल्वे प्रवास
सहल खर्च रु.८२००/-
रेल्वे प्रवास भाडे अधिक
कारवार
कुर्ग
९ दिवसात २७ ठिकाणी
१ डिसेंबर ते ३१ मे पर्यंत
प्रत्येक बुधवारी निघणार
९ रात्र १० दिवसाची सहल
रुपये:१८,०००/-फक्त
श्रीलंका
मालदिवज्
TOURWAYS
C-305 Palm Acres M.P.Rd Mulund east Mumbai 81
www.tourways.in
group discount
8 + 5% and 8+8 10%
राजेश रानडे
092232 73496
022 - 65 281 281
2

# संपादकीय

प्रिय सभासद मित्रांनो,

ज्या आनंदाची आपण आबालवृद्ध वाट पहात आहोत ती दिवाळी आता तुमच्या भेटीला येत आहे. दिवाळीच्या आनंदात भर घालण्यासाठी ‘संवाद’ मासिकाचा दिवाळी अंक आम्ही आपणास सहर्ष सादर करीत आहोत.

खरे पाहता श्रावणमासापासून गौरी-गणपती, दसरा हे येणारे सर्व सण म्हणजे आनंदाची उत्साहाची चढती कमानच असते. त्यानंतर येणारी दिवाळी म्हणजे आनंदाच्या सागराला आलेले उधाणच होय. माणसाच्या जीवनातली सगळी मरगळ धुऊन काढणारी ही दिवाळी! येणारी प्रत्येक दिवाळी नित्यनूतनच असते. कोणाच्या घरी जावयाचा दिवाळसण असतो तर कोणाच्या घरी नवीन पाहुणा जन्माला आलेला असतो. त्यामुळे सगळीकडे धामधूम असते. आणि ह्या प्रकाशाच्या दिवाळीत ज्येष्ठांच्या उत्साहाला हत्तीचे बळ आले नाही तरच नवल! आमच्या जोशी आजोबाची नातवांबरोबर आकाशकंदिल अन् किल्ल्याची जोरदार तयारी चाललेली आहे. तर जोशी आजी आपला मुलगा व सून अमेरिकेहून इकडे घरी दिवाळी साजरी करायला येणार म्हणून सर्व आळस झटकून दिवाळीच्या फराळाला व घरदार स्वच्छतेच्या कामाला नव्या उत्साहाने लागल्या आहेत. हे सर्व पाहिल्यावर आम्हाला मनोमन जाणवले की दिवाळीचा आनंद मुलगा-नातवंडांच्या प्रेमातच आहे.

प्रकाशाच्या ह्या दिवाळी सणासारखाच आपल्या ज्येष्ठांजवळ अनुभवाचा प्रकाश आहे. बुद्धिमत्ता, कल्पनाशक्ती आहे. माणसाचे आयुष्य १०० ते १२० वर्षे आहे असे कल्पले तर पहिली ६० वर्षे भौतिक सुखासाठी आणि उरलेले सारे आयुष्य स्वानंद सुखात डुंबण्यासाठी. ह्यासाठी आपले स्वतःचे आरोग्य उत्तम राखणे महत्त्वाचे. तसेच आपल्यातील सुप्त गुणांना वाव देऊन विविध छंद जोपासणे व निर्धारपूर्वक चांगल्या सवयी शरीर व मनाला लावणे म्हणजेच जीवनावर प्रभुत्व गाजविणे हीच आपल्या दृष्टीने खरी दिवाळी होय.

पत्नी-पत्नीचं व भावा-बहिणीचं पवित्र नातं दृढ करणारे आणि दिवाळीचा अविभाज्य अंग असलेले दिवाळी पाडवा व भाऊबीज आपले दिवाळीचा आनंद शतगुणित करणारे सण. आपलं प्रेम याप्रसंगी विविध भेटवस्तूंच्या रुपात आपण व्यक्त करतो. मित्र, नातेवाईक, शुभचिंतक यांचे दिवाळी शुभेच्छा पत्राद्वारे प्रेमाची देवाणघेवाण करतो. हे विशुद्ध प्रेम आपलं भावी आयुष्य आनंददायी बनवतं.

तेव्हा ही दिवाळी आपणा सर्वांना सुखाची आनंदाची व भरभराटीची जावो ही सदिच्छा.

- शरद शिंगवेकर

( We are reproducing the Editorial of "S.B.I.Pensioners' NewsLetter", a house magazine of Delhi Circle Pensioners' Association for information of our members )

# Woes of SBI Pensioners on Pension Issues No End in Sight

You are aware that your Federation/Association is working tirelessly for getting improvements in the Pension Scheme in State Bank of India for the last about 20 years. During this period a series of meetings with the Bank/Government of India have taken place. A few such meetings were also attended by Shri.P.K.Pathak, Vice-President and Shri.H.R.Magon, General Secretary along with the office-bearers of the Federation. Several representations have been addressed by the Federation to the Bank's Chairman, Secretary (Finance)/Secretary (F.S.), Government of India. A representation submitted to the then Finance Minister got signed by 104 MPs cutting across party lines fell on deaf ears. The Historic Dharna on 6th October 2008 at Jantar Mantar, New Delhi, and Banking Department, New Delhi as also at other Local Head Offices failed to melt the hearts of heartless and insensitive officials of Finance Ministry. Our efforts to meet the Congress President/Chair-person UPA and Finance Minister have also not yet fructified. In nushell, all the fervent appeals repeatedly made to SBI/GOI have been ignored by them with impunity. CZHo$ H$mZ na Oy§ VH$ Zht a|JVr. It is pertinent to mention that while salary structures of almost all the PSUs/Central Government Employees, Defence Forces, Police Establishments and more recently the Hon'ble Members of Parliament have seen vertical growth along with suitable increase in the pensionery benefits, the salary structure in our Bank though has been raised, the pension issues in SBI have not been addressed by the GOI/Bank.

The pension which pre-1993 retirees and those retired up to 31-10-2002 are getting is meager and works out to even less than a Senior Assistant who retires today. What a shame/pity ! Whenever this disturbing fact is brought to the notice of GOI, their stock reply is that any rise in Pension to SBI pensioners will have wide ramifications in the Banking Industry. This is, however, not true as State Bank of India has entirely different Pension Scheme viz-a-viz other Banks. Our pension scheme is totally independent for the last 150 years and the Bank has capacity and capability to pay as its profits are scaling new heights year after year. The State Bank of India has a Pension Fund Corpus of around Rs.20,000 crores ! **While the Bank is 'shining', old retirees are suffering'.**

The main demands of the pensioners' fraternity are :-

(i) payment of pension to all eligible pensioners/ retirees at 50% of the last drawn salary.
(ii) 100% neutralization of Dearness Relief.
(iii) Fixation of Pension for Seventh Bipartite retirees (i.e. retired between 1-11-1997 & 31-10-02) on the basis of salaries they received at the time of their retirement; presently they are being paid pension on the salary scales of VI$^{th}$ Settlement.
(iv) Updation of pension with every successive wage revision in the Bank on the lines of Sixth Central Pay Commission.
(v) Family Pension at 30% on Government pattern.

To recapitulate and in order to understand the issues in the right perspective, we advise for the benefit of our members that the IBI Pensioners' Association (Delhi Circle) filed a Writ Petition in the Supreme Court in 1987 for pension at 50% of last pay drawn. The Supreme Court in the historic jedgment delivered on 23-02-1989 directed the Bank to:

**"Delete the clause of original ceiling and fix the pension at Rs.2,400/- at 50% of maximum salary i.e. Rs.4,800/- p.m. at that time."**

The other operative part of this landmark jedgment is also reproduced below :

**"Pension is a right, not a bounty, it would not be proper to leave the quantum of Pension at the discretion of the Trustees in each case. To do so would be to leave the employees at the mercy of the Trustees who would naturally exercise the discretion in any manner they like in the absence of guidelines. Even in the case of Central Government employees only the outer ceiling is followed .......... We, therefore, think that the outer ceiling of Rs.2,400/- should suffice. We are therefore of the opinion that the figure of Rs.1,300/- in the proposed Rule 20(1)(a) should be replaced by the figures of Rs.2,400/- and the proviso should be deleted. Consequential changes, wherever necessary, should be made ........... New Pension Scheme will be made**

**effective from January1, 1986 and consequential benefits will be given a period of three months from today."**

The increase in ceiling thus ensured payment of pension at 50% of pay to all the eligible pensioners at that time. However, when the next wage settlement was finalized, the Bank/GOI did not simultenously raise the ceiling to 50% of the maximum salary despite the assurance given by them in the Supreme Court during the proceedings of the aforesaid case. They have not done so (raising the ceiling) in the successive wage settlements except when the ceiling was raised to Rs.21,040/- in 2006 after nation-wide strike by the working staff Federations. This ceiling too was applicable only to VIIIth Bipartite retirees (2002-2007). The employees retiring now are also being paid pension on the basis of the aforesaid ceiling whereas it should have been increased after IXth Bipartite Settlement. Further, instead of providing some relief to the retirees, the GOI arbitrarily introduced the concept of 50% & 40% w.e.f. 01-03-1999 thus creating another class. Further, in the VIIth Bipartite Settlement, the definition of the 'Pay for pension' was changed and pension to retirees under this settlement is being calculated on the basis of their pre-revised salary i.e. salary scales of VIth Bipartite Settlement, on the 50% & 40% formula, thus reducing their pension to mere 26.3% instead of the actual 50% or 40%. This is something unheard of in any civilized society.

The problems/woes of the pensioners in fact started when the Vth wage settlement concluded after the Supreme Court Judgment quoted above and the Bank did not raise the ceiling as afore mentioned automatically, thus defeating the cardinal principle laid down by the Supreme Court in its historic Judgment dated 23-02-1989. No amount of persuation during the meetings with the officials of the Finance Ministry from time to time and by letters to them in this regard could cut ice with them. The officials of the Ministry of Finance are so defiant and arrogant that they have scant respect for plethora of Judgments pronounced by the Supreme Court on pension issue from time to time. A few favourable judgments are mentioned below :-

I. D.S.Nakara Vs Union of India; 1983 (i) SCC 305
II. IBI Pensioners' Association Vs SBI : 1989 Suppl (i) SCC 236
III. V. Kasturi Vs SBI : 1998 (8) SCC 30
IV. Subroto Sen & others Vs Union of India & others 2001 (6) SCC 382
V. Charanjit Lal Chaudhary Vs Union of India & others : AIR 1951 SCC 41
VI. Anant Mills Co. Ltd Vs State of Gujarat : 1975 (i) SCC 175
VII. Raghavendra Acharya Vs Govt. of Karnataka
VIII. L. Kanniah Vs Union of India: 2003(10)SCC 499

In the recent past, a few more favourable judgments have also been delivered by the Supreme Court. Such is the attitude of the officials of GOI and they seem to have nursed a permanent bias against the pensioners of SBI for the reasons best known to them. Quite often, upright men fighting for the JUST CAUSE have encountered violent opposition from mediocre minds.

Having been driven to the wall by this stubborn attitude adopted by the GOI and having exhausted all the avenues at our command for getting a fair negotiated settlement of the issues/demands of the pensioners, coupled with the fact that the Court Cases already filed by the Federation affiliates and a few individual pensioner/group of pensioners have been in limbo for a long time, it has now been thought expedient by the Federation to try our luck in the Supreme Court of India against the injustice being heaped on IBI/SBI Pensioners and seek an honourable settlement to our countless woes. This being a **"do or die"** initiative would entail huge financial expenses. This step is also necessary to put an end to the long unproductive struggle which we (Federation along with its affiliates) are having with the GOI/Bank. For the initiative to succeed throughout the country, the financial cooperation from each and every retirees is a must. A little sacrifice made at this stage on the part of all our members would go a long way in meeting our share of contribution to the Federation for filing and contesting the case in Supreme Court of India. it is pertinent to state that if we succeed in our **"Dharam Yudh'** in the Supreme Court it would be the end of our woes.

We hope that our members would willingly come forward to make a small monetary sacrifice to get a permanent solution to our long pending pension issues for all times to come. The quantum of contribution will be decided by the Managing Committee of the Circle Association and an **Appeal** would be sent to each member separately through respective Units at the appropriate time.

*******************

## स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल),पुणे

## औरंगाबाद झोनल सब्-सेंटर

### वार्षिक सर्वसाधारण सभा - २०१०-११

### नोटीस

स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशनच्या औरंगाबाद झोनल सब-सेंटरची २०१०-११ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.५ डिसेंबर २०१० रोजी सकाळी १० वाजता खालील ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहे.

**ठिकाण : शानबाग मंगल कार्यालय**
**प्रभात कॉलनी जवळ,**
**एम.जे.कॉलेज रोड, जळगांव**

### कार्यक्रम पत्रिका

१. दि.३०-१०-२००९ रोजी झालेल्या मागील सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून मंजूर करणे.
२. मागील सभेनंतर मृत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहणे.
३. मागील सभेच्या तारखेनंतर ज्या सभासदांच्या वयास ७५ वर्षे पूर्ण झालीत अशांचा सत्कार.
४. उपस्थित मान्यवरांचे मार्गदर्शन.
५. मागील वर्षभरातील नवीन सभासदांचे स्वागत व वार्षिक जमाखर्चास मान्यता.
६. सभासदांसाठी खुली चर्चा / ऐनवेळचे विषय.
७. अध्यक्षीय समारोप.

तरी औरंगाबाद झोनल सब-सेंटर कार्यक्षेत्रातील सर्व सभासद, सहसभासद व फॅमिली पेन्शनर सभासदांनी सभेस उपस्थित रहावे ही विनंती. सभासदांना वेगळी निमंत्रण पत्रिका पाठविण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

नागेश जोशी
दि.१५ ऑक्टोबर २०१० विभागीय सचिव

**विशेष सूचना**

१) निवासाची व्यवस्था व इतर चौकशीसाठी श्री.वसंतराव बाविस्कर, जळगांव (मोबाईल क्र. ९८२२४७८०३०) यांचेशी संपर्क साधावा.
२) जळगांव शहरातील शाखांतर्फे पेन्शनर्स मीट त्याच दिवशी सर्वसाधारण सभेनंतर आयोजित करण्यात येईल.

*****

**S.B.I.Pensioners' Association (M.C.) Pune**
**MUMBAI SUB-CENTRE**

No. P-89
Dt.:04-10-2010

The Secretary
SBI Pensioners' Association
Mumbai Circle,
PUNE

Dear Sir,


**SAMVAD**

We enclose herewith a card which shows how our members value the services rendered by the Association and express regret for the slightest delay on their part in responding to the call of the Association for contribution of the Legal fund.

Shri.Sudhakar Sawant is a retired Dy. General Manager and our member from Mumbai.

Yours faithfully,
Sd/-
(V.M.Gokhale)
President

Encls.



## कोल्हापूर युनिट :-

बुधवार दि.२९ सप्टेंबर २०१० रोजी कोल्हापूर युनिटची वार्षिक सभा खरे मंगल कार्यालय येथे संपन्न झाली. तसेच याच ठिकाणी याच दिवशी बँकेतर्फे पेन्शनर्स मीटआयोजित केली होती. वार्षिक सभेत सर्वश्री पी.एम.नारकर, सर्कल उपाध्यक्ष, रा.ना.लळिंगकर, सर्कल सेक्रेटरी, एम.एम.सरदेशमुख, सर्कल जॉइंट सेक्रेटरी, पी.एच.चाटे, पुणे झोनल कार्यकारिणी सदस्य तसेच बँकेचे सहा.महाप्रबंधक श्री.रमेश मुजुमदार व श्री.राणे, मुख्य प्रबंधक व श्री. प्रविण मोरे, म्युच्युअल फंड अधिकारी हे आवर्जून उपस्थित होते. सभेस सुमारे २५० सभासद उपस्थित होते.

मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केल्यानंतर दीपप्रज्वलन करून सभेस सुरूवात झाली. त्यानंतर गतवर्षात दिवंगत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहिल्यावर, नवीन सभासदांचे गुलाबाचे फूल देऊन स्वागत करण्यात आले. तसेच खालील प्रमाणे सभासदांचे सत्कार करण्यात आले.

१) घरातील अनेक वर्षे अंथरूणाला खिळून असणाऱ्या नातेवाईकांची न कंटाळता सेवा करणाऱ्या चार सभासदांचा श्री.नारकर यांचे हस्ते प.पू.गोंदवलेकर महाराजांचे प्रवचनाचे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

२) आपला छंद जोपासणाऱ्या १० सभासदांचा सत्कार श्री.लळिंगकर यांचे हस्ते करण्यात आला. तसेच समाजकार्य करणाऱ्या २ सभासदांचा ज्येष्ठ सभासद श्री.एस.पी.पांडे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

सचिव श्री.प्रकाश चित्रे यांनी वार्षिक अहवाल वाचन केल्यावर खजिनदार श्री.डी.जी.करंबेळकर यांनी वार्षिक जमा-खर्च सभेपुढे सादर केला. सभेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून गेली ३०-४० वर्षे सामाजिक कार्य करणारे श्री.अरविंद पित्रे यांना आमंत्रित केले होते. त्यांनी जयपूर फूट निर्माण कारखाना कर्नाटकात तसेच नांदेड येथे चालविला आहे. तसेच ते मूक-बधिर व अंध व्यक्तींसाठी शाळा चालवितात. सभेत त्यांनी भारताचा कारगील विजय या विषयावर रोमहर्षक कहाणी कथन केली.

यानंतर सहा.महाप्रबंधक श्री.रमेश मुजुमदार यांनी पेन्शनर्सना मार्गदर्शनपर भाषण केले. त्यानंतर श्री.नारकर व श्री.लळिंगकर यांनी, पेन्शनविषयक प्रश्न सोडविण्यासाठी असोसिएशन करीत असलेल्या प्रयत्नांची व कोर्ट केसेस संबंधी सविस्तर माहिती दिली व शंकानिरसन केले.

सभास्थानी आपले सभासद श्री.दत्तात्रय धर्माधिकारी यांनी त्यांच्या कॉइन-कलेक्शनचे प्रदर्शन भरवले होते. २०१०-२०१२ या दोन वर्षासाठी नविन पदाधिकारी व कार्यकारिणीची या सभेत निवड करण्यात आली.

१) श्री.जगदीश दि.दिवाण - अध्यक्ष;
२) श्री.उल्हास श्री.पत्की - उपाध्यक्ष;
३) श्री.पांडुरंग बा.पाटील - सहाय्यक उपाध्यक्ष;
४) श्री.सतीशचंद्र ज.मुधाळे - सेक्रेटरी;
५) सौ.पद्मा चं. बेकीनकर - सहाय्यक सेक्रेटरी;
६) श्री.जयंत भा.रुकडीकर - खजिनदार

सभेनंतर सुरुची भोजनाचा आस्वाद सर्वांनी घेतला. या कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी सर्वश्री आर.आार.कुलकर्णी, आर.जी.कुलकर्णी, पी.एम.पोंक्षे, चंद्रकांत किंकर, प्रभाकर कानिटकर, सुरेश वालवाडकर, सतीशचंद्र मुधाळे, जयंत रुकडीकर, प्रकाश प्रभू इंगळीकर, डी.जी.करंबेळकर, प्रकाश हाळबे, नारायण साठे, सौ.बेकिनकर, सौ.देशपांडे व इतर सभासदांनी यांनी मोलाचे सहकार्य केले. सूत्रसंचालन सौ.उमा नामजोशी व आभार प्रदर्शन श्री.कानिटकर यांनी केले. शेवटी पसायदान गायनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

- रमेश ग. कुलकर्णी, अध्यक्ष


'संवाद' च्या सर्व वाचकांना

**दिवाळी आणि नूतन वर्षाच्या**

***हार्दिक शुभेच्छा***

**ॲड. अमित विनायक ताम्हनकर**

B.S.L.,LLB

**ऑफिस** : ३५, चित्रशाळा,
३५४ नारायण पेठ,
लक्ष्मीरोड, पुणे ४११०३०

**घरचा पत्ता**
सर्व्हे नं.२०/६/अे, निसर्ग अपार्टमेंट,
फ्लॅट नं.१०८, दुसरा मजला,
रिद्धी-सिद्धी पॅरडाईज,गारमाळ,
धायरी रस्ता,
पुणे ४११०४१
मोबाईल नं. : 9423235727

Mumbai
28th August 2010

The Secretary,
SBI Pensioners' Association,
Mumbai Zonal Sub-Centre,
Thane

Dear Sir,

I am Pradeep J.Nabar, one of the pensioners of SBI. recently, I read in SAMVAD that respected Shri.V.M.Gokhale saheb, our Circle President made an appeal to the pensioners to generously donate for meeting the legal expenses incurred for filing writ petitions/defending cases which are for the benefit of pensioners.

I have highest regard and respect for Shri.Gokhalesaheb, both as a person and my senior in the Bank. In fact, whatever I could achieve in the Bank during my service was to a great extent due to his guidance, support and encouragement on several occasions. therefore, as a token of my love and affection for him I have contributed a sum of Rs.5,000/- for the noble cause. I also take this opportunity to wish all our pensioners and their family members sound health, happiness and prosperity, in that order.

With best regards.

Yours affectionately,
Sd/-
( Pradeep J. Nabar)
Membership No.PM/9639 & APM/8425

## अभिनंदनीय

आपल्या मुंबई येथील सभासद सौ.अरुणा दिनकर सामंत यांचा सुपुत्र चि.हृषिकेश हा २०१० सालच्या मुंबई विद्यापीठाच्या टी.वाय.बी.कॉम. च्या परीक्षेत ९२% मार्कस् मिळवून सर्वप्रथम आला त्याबद्दल असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन. दहावीच्या परीक्षेत ९३% मार्कस् मिळवून १३ वा, तसेच १२ वीच्या परीक्षेत ९२% मार्कस् मिळवून वाणिज्य शाखेत पहिला आला होता. चार्टर्ड अकौंटंटच्या दुसऱ्या परीक्षेतही असेच चांगले यश संपादन केले आहे व त्याची पुढील प्रगती उल्लेखनीय आहे. शास्त्रीय संगीत ही त्याची लहानपणापासूनची आवड आहे. त्याच्या पुढील वाटचालीबद्दल शुभेच्छा.

– सेक्रेटरी

Jayant V.Hathi
B/201 Tulsi Aptt,Plot -133/134,
Sector 28, Vashi,
Navi Mumbai - 400703
31-08-2010

Dear Shri.V.M.Gokhale,

I had an intense desire to attend your Annual General Meeting at Pune on 12th July 2010 but could not make it at the last moment.

I am an ardent fan of your magazine "Samvad" as it provides very useful information on topics which are of interest to the members.

I had, in details gone through the issue of Samvad for the month of June 2010, which really impressed me. The Secretary and Shri.B.P.Khare, the Treasurer, have presented the accounts in a very transparent and efficient manner, for which both deserve full compliments. Your election process is also very lucid and non-controversial and is done in General Body Meeting.

Having a large number of members (16728), your expenses are under control and loss the minimum. It is an ideal example for Circle like ours. Your team is doing an excellent work for the Organisation in particular and membership in general. This is reflected in the Donations you receive. you have, in Shri.Dandekar, "A living Thesis on SBI Pensioners' problems". His knowledge in this field is "par Excellence". I adore him and respect him from my heart. He is an asset for your organization.

In appreciation of your best functions, I enclose a cheque for Rs. 500/- as donation from me.

With regards,

Yours sincerely,
(Sd/-)
(J.V.Hathi)

## अभिनंदनीय

आपल्या औरंगाबाद झोनल सब्सेंटरचे अध्यक्ष श्री.साहेबराव देसाई व सौ.कमल देसाई यांची सुकन्या डॉ.निलाक्षी देसाई, F.R.C.A., यांची नियुक्ती ग्लॅस्गो (यु.के.) येथील हॉस्पिटलमध्ये रजिस्ट्रार म्हणून झाली आहे. त्याबद्दल असोसिएशनतर्फे त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. त्यांचा जन्म मालेगाव तालुक्यातील झोडगे या छोट्या गावात झाला. पण शिक्षणात विशेष प्राविण्य मिळवून त्या आज इंग्लंड येथे वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहेत हे निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यांना उज्ज्वल भविष्याबद्दल शुभेच्छा !

– सेक्रेटरी

## THE MAGIC OF AWARENESS

Paul Coelho's book "The Alchemist" inspires me for positive thinking. He speaks of 'omens' - meaning one gets certain positive /negative signs of a future event in the present moment. In order to understand or read these signals one needs to develop a keen sense of observation and consciousness. For instance, when you are on an important mission you start getting positive omens right from the beginning & if you become aware of those signs you are confident of your success.

I decided to experiment the basic truth of omens in real life and found a great deal of reality in many events. This trend of omens set me on a different track of thinking. I started questioning myself about my level of awareness about my surroundings, my thought process, and my relationships and so on and so forth .My subconscious mind geared into active thinking. Gradually on going deep into my thoughts I became conscious of happenings around me& of the intensity of my personal relationships.

Awareness of the physical events happenings around you prepares you mentally to face any situation in the near future. Mental awareness makes you aware of your weaknesses & strengths. It then becomes easier for you to overcome your shortcomings & work on your strengths. In the process your negative trends get automatically weeded out & help you to focus on constructive work.

Constant awareness at every level of thinking beams search lights in every nook and corner of your subconscious mind. Your vision changes, the same events, the same persons acquire a different dimension, something you had never imagined before. The true picture of reality emerges in full light.

Awareness sharpens your concentration power with a zest to perfect yourself in the smallest of tasks even in the daily routine of life. Every task leaves behind golden prints of your creativity.

The entire scene of your life changes not because the world has changed but because your enlightened vision has changed, your attitude, your way of looking at things has changed. This change has triggered a series of changes in your relationship with your friends, family and society..

THE MAGIC OF AWARENESS lends you new colours to paint your life's picture in the hues you want. It expands your world so much that you start thinking of ways & means as to how you could make a difference in the lives of others.

After series of rendezvous with your inner self, your imagined self merges into your real self. You see yourself as you are. Your self esteem rises and empowers you with a sudden flow of energy from a hidden spring lying buried for aeons within the chambers of your heart. You have at last discovered your real self -the epitome of God's most creative image.

The walls of your ivory tower of isolation break down and you become a part of the collage of your family, friends and society at large. You start sharing your treasure of peace and love with others and have a sense of belongingness. You are at peace with yourself and with others. Your mission is complete. You have fulfilled God's purpose of sending you on this earth.

Once you start increasing your level of awareness, you will be able to read the OMENS as they occur & feel its MAGIC working for you.

***- Mrs. Manjeeta Y. Deshmukh***
Andheri (East). Mumbai- 400069
Mob.9699376696

## अभिनंदनीय

आपले सभासद श्री. शामकांत पटवर्धन यांना श्री यशलक्ष्मी आर्टस् व स्वरश्री संगीत मंडळ यांनी आयोजित केलेल्या संगीत स्पर्धेत 'सुगम संगीत व उपशास्त्रीय संगीत' या विभागात प्रथम पारितोषिक मिळाले. या सुयशाबद्दल श्री. पटवर्धन यांचे असोसिएशनतर्फे अभिनंदन.

*****

आपले एक सभासद श्री. ब्रिजलाल नाईक यांनी 'शिक्षण प्रसारक मंडळी, तलाव विभाग', पुणे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी मार्सेली येथे भर समुद्रात उडी घेतलेल्या १०० वर्षे पूर्ती निमित्त भरवलेल्या 'पाण्यात उडी मारणे' स्पर्धेत 'डेडमन्स डाईव्ह' प्रकारचा दुसऱ्या मजल्यावरून सूर मारून अभिनव यश संपादले. वयाच्या साठीनंतर हे धाडस दाखवल्याबद्दल त्यांचे असोसिएशनतर्फे अभिनंदन - सेक्रेटरी

**असोसिएशनच्या लीगल फंडाला सढळ हाताने देणगी द्या!**

## Summer Solstice

I was seated in the departure lounge of Dum Dum airport, Calcutta. It was around 12.30 pm on June 21, 1991. That day every year, the sun changes direction and is farthest from the earth. Summer Solstice! There was a light drizzle and the black clouds above held promise of a torrent. I watched moodily, the landings and take offs. The weather was absolutely in tune with my somber mood. I had left my family in Panjim the day before and caught the early morning flight from Bombay after spending the night at my sister's. And now, here I was at Dum Dum waiting for the last leg of my journey - to the North-East, where my employer (State Bank of India) had posted me for two years.

It had all happened too suddenly. Out of the blue, on May 29, the transfer order came in by telex with instructions that not more than 10 days' time should be allowed. Less than a week away, on June 04, the academic year was to commence and all my anxieties were centered round the elder of my two daughters, who would be in the crucial Standard X. I have done precious little in the matter of my children's studies but not to be there at all was certain to have an impact. My daughter, normally very mature and reticent for her age, wept uncontrollably and asked me why this happened only to me, when there were so many others, who don't seem to ever leave the town in which they started out. I must confess I manipulated her a little bit then.

"Do you want me to go and fall at someone's feet or plead some illness on the basis of a false medical certificate?"

"No, No! Appa! Will I ever want you to do that? You go ahead. I will be fine."

I felt I must press home the advantage and ensure that she doesn't give way to self-pity.

"The Bank is a very fair and benevolent employer. This transfer is in accordance with the terms of my employment. True, they could have considered my appeal to postpone this by one year so that your school final is over. But remember, there are a thousand employees at any point of time tugging at the Bank's elephantine heart-strings. Quite often, the wrong sort of chap gets the reprieve in a situation like this. All the same it would be undignified to question the organization."

"Ok dad! I know, I know". By now, she was smiling faintly.

So it was that the day before, I left her with her sister and mother, all waving me a sad good-bye as I got into the car. I was overcome by a tremendous sense of inadequacy. Seventeen years in the service of the Bank and I had not the resourcefulness and the nerve to extricate myself from this! Was it wrong to beg some one higher up or do whatever it takes for the sake of my daughter? Is it not ego which prevented me from doing so? And manipulating my innocent girl's feelings, was that not a rotten trick?

These were the gloomy thoughts that enveloped me, when I got into the car at Panjim and they stayed with me as I went through the security at Dum Dum. I seated myself in the farthest possible corner of the departure lounge. There was another 40 minutes to go for my flight.

Suddenly, I saw a number of passengers rushing forward and gathering before the TV. I followed them. The screen showed a large gathering of people (well-known politicians) in a chandeliered hall. A hush fell on the departure lounge as we saw a balding man of scholarly appearance with permanently flared nostrils uttering these words:

"I Pamulaparti Venkata Narasimha Rao do swear in the name of God that I will faithfully execute the office of Prime Minister………"

I had completely forgotten. Our new PM was to be sworn in at 12.50 pm. Only the day before, the papers had given some idea of this low-profile personality. A well read man, he knew several Indian and foreign languages. Whenever any document was placed before Rajiv Gandhi (as PM), he would take a look and then say: "show it to PV". But at that moment, I was hardly thinking of his merit or his qualifications. It could have been anybody in his place. What I felt was a sudden, tremendous surge of pride and reassurance. From Goa on the Arabian Sea which I had left the day before to Guwahati on the Brahmaputra in the North-East (not quite the country's extremity) where I would be by sunset today, I would have traveled 4000 plus kilometers but I would still be in my country. And this was my Prime Minister.

A terrible tragedy had overtaken our country only last month; a human bomb had ripped through the young handsome form of our former Prime Minister in the middle of the election campaign. Yet, here we were, exactly a month later, election completed, swearing in a new Prime Minister. It struck me too, that for the first time, a man from south of the Vindhyas will be occupying the high office and we were not making a hue and cry about it.

The swearing in had ended and the new Prime Minister was shaking hands - first with the President and then with the other guests gathered in the central hall of Rashtrapati Bhavan. The crowd around the TV broke out into an animated chatter. Just then, I heard the announcement: "Indian Airlines Flight IC 171 to Guwahati is now ready for departure. Passengers are requested to proceed to the aircraft through gate no. 4".

I stood up, tossed my bag casually over my squared shoulders and told myself: "Guwahati, here I come! Get ready to welcome me." Then as I started walking with that new found assurance, I saw that a hundred others were accompanying me towards the waiting plane.

***- P. R. Viswanathan***

Panvel, Maharashtra, (M) 98204 33106

## संवाद लेख स्पर्धा २०१०
## पुरुष विभाग- तृतीय पारितोषिक विजेता लेख
# 'या सुखांनो या'

लेखनाचा विषय बघून कवीवर्य कुसुमाग्रजांच्या निळा पक्षी या कवितेतील खालील ओळी आठवल्या चिरंतन सुख कशात आहे याचं सार्थ वर्णन.

उष:कालचे प्रकाश मंडल येता प्राचीवर
निळे पाखरू त्यातून अवतरले सुंदर
फुलराणींचे विलासतारू निळी उभारूनि शिडे
सोनेरी दारातूनी आले - आले माझ्याकडे
पालवलेल्या मृदुल पाकळ्या पंखाच्या मिटवुनी
झाले ज्यावर दिसे उषेच्या किरणांचे सिंचन
स्वप्न निळे त बसे अंगणी हिरव्या वेलीवरी
आकाशाचा आशीर्वादच आला माझ्या घरी

हा आकाशाचा आशीर्वाद निश्चितच सुख घेऊन आला. कवी आशावादी आहे. त्या निळ्या पक्षाच्या आगमनाने त्याचा आनंद शतगुणीत झाला आहे. सुखांना सुरेख साद घाला ती तुमच्या पायाशी लोळण घालतील आणि मग त्या सुखात डुंबून जा काया मोहरेल कल्पनांना धुमारे फुटतील अन् जीवन समृद्ध होईल.

संकटात माणसाला देव आठवतो. तो संकट मोचन हरीचा धावा करतो. त्याला साद घालून बोलावलं अन् संकट निरसन झालं की स्वत: सुखावतो. त्याला साद घालावी लागते तीही श्रद्धेने. गजेंद्रमोक्ष गोष्टीत पण तो गजराज त्या हरीला साद घालतो.

''कृष्णा धावरे संकट पडले फार
हरी तू आमचा कैवारी आले विघ्न निवारी''

एकूण काय तर प्रत्येक व्यक्ती आपल्या आराध्य देवतेला साद घालते अन् संकट निवारण करून घेते. तशीच सुखांना पण अशी साद घालावी ती खरंतर तुमच्या जवळच असतात. ती निश्चित येतील ही श्रद्धा मात्र हवी. सुखांना बोलवा, त्याचं आदरातिथ्य करा, त्यांना ओळखा तरच ती तुम्हाला आनंद देऊ शकतील आणि अशी सुखाची सरोवरे माणूस निर्माण करू शकेल तर त्यांच्या जीवनात सात्त्विक आनंद बरसेल. त्याचं जीवन रसरशीत होईल. मनाची मरगळ दूर होईल. जीवनात आनंदाचे झरे अवतरतील. जशी कोकिळा वसंताच्या आगमनाची प्रार्थना करून तप आचरते; अन् वसंताचं आगमन होतं आणि कोकिळ गुंजन सुरू होतं.

सुखाचं आगमन झाल्यावर त्यावर आनंदाच्या लहरी निर्माण होतात. तो आनंद भोवतालच्या लोकांनापण भावून जातो. जीवन संगीताला सूर सापडतो. अन् बरीच सुखं तुमची मंडलीक होतात. जीवनातला जोश कायम ठेवायचा असेल तर सुखांना बोलवा ती तुमच्या सर्व प्रकारच्या दु:खावर फुंकर घालायला निश्चितच येतील. आलेलं सुख उपभोगण्याची क्षमता अंगी वाढवा.

सुख आले माझ्या दारी । मज काय कमी या संसारी ।।

पण असं सुख सहसा आढळत नाही. जीव जन्माला आल्यापासून तो सुखाचा भोक्ता असतो पण त्याला समजत नसते जन्माला आलेला जीव पहिल्या तीन श्वासांना सोहं, सोहं, सोहं म्हणजे मी मीच आहे असे म्हणतो. पण नंतर कोहं ऽऽ कोहंऽऽ कोहं म्हणजे मी कोण असं शेवटच्या श्वासापर्यंत विचारत असतो आणि आपल्या दु:खाचा खजिना वाढवित जातो. इतरांपेक्षा मी श्रेष्ठ आहे ते भूमिती श्रेणीने पटवून देण्याचा प्रयत्न करतो. माझ्याकडे अधिक हवं या इर्षेपाई भांडण, चोरीमारी, फसवणूकीच्या जाळ्यात बांधला जातो.

ॲडमचा जन्म झाला अन् केवळ अधिक सुखासाठी त्याला ॲपल खाण्याची इच्छा झाली. पण अधिकच्या हव्यासापाई त्याची दु:ख वाढली. मग माया, मोह, क्रोध इ. शडरिपूंच आगमन झालं अन् त्याची सुखाची स्वप्न विखुरली. मालकी हक्क, लालसा, असुया, वैध्य, अवैध्य याचं भान उरलं नाही. वैचारिक दृष्टीनेही तो सैरवैर झाला. मानसिक आजार, विकृती ह्यांनी मानवी शरिराचा ताबा घेतला.

संपत्ती सत्ता मिळवून तो सुखाला पारखा झाला. कारण सत्ता व संपत्ती हे पण टिकविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. अन् हे देवाला पण जमलं नाही. नाथांच्या विद्या आत्मसात करण्यासाठी इंद्राला पण महामखाचं निमित्त करून मोररूपाने विद्याचौर्य करावं लागलं होतं.

आमचे एक स्नेही भगवंतराव, आपण सोसलेले कष्ट, भोगलेल्या वेदना हेच त्यांचं भांडवल, आप्तांबद्दल घृणा, समाजाबरोबर कुरकुर ते सुखांना कधीच सामोरे जाऊच शकत नाहीत. सुख कसं उपभोगायचं याची जाण नसते. त्यांच्या आज्ञाचक्रावर कायम आठ्यांचं जाळं.

आता परवाचच उदाहरण, त्यांच्या मुलाला मुलगा झाला हे निखळ सुख पण ते पचवू शकले नाहीत. एक गोड चिमुकला जीव घरात आला पण हे जमदग्नी म्हणतात मुलगा सून नोकरीवर जाणार त्याला सांभाळणार कोण! घरात बायकोचा पिट्टा पडतो ही एक आणखी जबाबदारी. माझ्याकडे अधिक दुर्लक्ष. किती ही कोती विचारसरणी. काही लोकांना सुग्रास अन्न पचविता येत नाही. या माणसानं निसर्गानं बहाल केलेलं सुख पण गोंजारता येत नाही. (नाव भगवंत पण नेहमी दुश्चीत). सुखाचं स्वागतच नाही तर ते येणार कसे ?

माणसाचा जन्ममूळी सुखासाठी झालेला आहे. जन्माला आल्यावर त्याच्यावर मातृसुखाचा वर्षाव होतो. तोच त्याला मोठा करतो आणि शहाणा करतो. हे सुख पुरून उरावं म्हणूनच पहिले काही महिने ती दोघचं असतात. त्यांच्यामध्ये कुणीही नसतं. त्या सुखाची नाळ कधीही कापली जात नाही. पुढे ती अदृष्य स्वरूपात असतेच. पाळणा सोडून आपल्या घरातील सर्वांना ते अपत्य आपलंसं करत असतं. आपल्या रूप अन् गुणांच्या जोरावर ते सुखांना

पाचारण करतं.

प्रभु रामचंद्राने पण चंद्राचा हट्ट धरला. त्याला चंद्र जवळ असण्याचं सुख हवं होतं. तर कौसल्येने रामाला आरसा देवून चंद्राचं सुख बहाल केलं. सुखाचा आग्रह धरा ते तुमच्याकडे येणारच. सुख ही संवेदना निर्माण करतो वेदनेला थारा देत नाही. यासाठी आणखी एका गोष्टीची आवश्यकता असते. छोट्या छोट्या गोष्टीतून आनंद वेचायला हवा. उगीचच गंभीर चेहरा करून आत्मकोषात कोंडून घेण्याची गरज नाही. त्यामुळे आपण बऱ्याच सुखांना पारखे होतो. केवळ डॅफोडिल्सच्या दर्शनानं आग्लं कवी वर्डसवर्थ मोहित झाला. त्याच्या मनाची मरगळ गेली. वास्तविक ती फुलं तिथे शतकानुशतके फुलत असतीलच. पुढं तो म्हणतो की जेव्हा मी विचारांनी त्रस्त असतो तेव्हा माझ्या आरामखुर्चीत बसून ती फुलं मी डोळ्यासमोर आणतो आणि आनंदाच्या महासागरात हरवून जातो. किती छोटी गोष्ट पण कवीनं त्यात आनंद शोधला आहे. सुखांना गवसणी घातली आहे. अशा बऱ्याच गोष्टी आपल्यासमोर असतात ज्यातून आपण आनंदाचा डोह शोधायचा असतो. प्रयत्न तर करून पहा, सहज जमेल. ''आनंदाचे डोही आनंद तरंग''

शाळेत जाणाऱ्या दोन किशोरवयीन मुलींची बडबड जरा ऐका, पुस्तकात जपलेल्या पिसांवर त्याचं मुक्त विवेचन, त्याची मर्यादित स्वप्न, त्याचं रसग्रहण, त्यांच्याच शब्दात एकूण निश्चितच सुखावह असतं. कित्ती छोटी गोष्ट. म्हणूनच या बडबडीला किलबिल म्हणतात. ऐकणाऱ्यांचे कान तृप्त होतात आणि माणूस विकारापासून दूर होतो.

हीच किशोरवयीन तारुण्यात प्रवेश करतात. तेव्हा त्यांचे विषय बदलतात. डोळ्यातली स्वप्न दाट होतात. हसू अन् आनंद गालाच्या खळ्यातून प्रवाही होतं. संवाद रंगतात. वळणावर थांबून गप्पा होतात. अनेक थांबे घेऊन घरी जाणं होतं. वास्तविक ह्यात अगदी साधे विषय असतात. प्रत्यक्ष खोलपणा नसतो. तरी त्यात थ्रील असतं. त्या वयात पालकांपेक्षा मित्र मैत्रीणीत मन रमतं. त्या सुखांना बोलावत असतात आणि अनुभवलेल्या सुखाचा आस्वाद घेतात.

प्रसंग अगदी साधा एखादा ग्रुप बरिस्तामध्ये आस्वाद घेत असतो तेव्हा एकीच्या बिल्डिंगमधलं नवदांपत्य कॉफी प्यायला येतं. त्यांच्या सर्व गोष्टींचं त्या दहा-बारा डोळ्यांच्या कॅमेऱ्याने शुटींग सुरू होतं. प्रत्येकाची टिपण्णी वेगळी, अँगल वेगळा, केस काय मॉड आहेत, चौकोनी चेहऱ्याला शोभत नाहीत. नवरा बाकी मेषपात्रच आहे. कॉफी पिताना काय मांजरीसारखा आवाज काढते आहे. प्रत्येक पॉईंटवर महाचर्चा घडतात आणि ग्रुप-ग्रुपमध्ये हे वाचन घडत जातं त्याच उत्साहात.

इतक्या छोट्या गोष्टीत जर ही तरूणाई आपला आनंद शोधत असेल आणि आपली मनं उत्साहित करत असेल तर हीच खरी सुखाला दिलेली साद आहे हे नक्की. कुठलंही वैमनस्य नाही पण त्यांचा काळ सुखाचा ठरतो. सुख शोधण्याचे मार्ग अनेक आहेत ते शोधायला ताजं टवटवीत मन हवं.

सुख ही एक सिद्धी आहे. ती आपल्या दारातच आहे. एकदा बोलवा ती हजर होईल. प्रपंचात अडचणी यायच्याच. त्याचा सामना करण्यासाठी तुमच्याकडे सुखाची शिदोरी हवी. तिळभराच्या सुखात डोंगराएवढ्या दु:खाशी सामना करण्याची ताकद आहे. निसर्गाकडे प्रेमानं पहा. समुद्राचं रौद्र रुप अनुभवा, सचैल स्नान करणारी पर्वत शिखरं बघा, वळणावरून धावणारी नदी पहा.

पहाटेचं पक्षांचं गुंजारव ऐका. परसातला पारिजातकाचा सडा अनुभवा. अगदी सिंगल रोझ इज ऑल्सो माय गार्डन ही संकल्पना ठेवा. एखादी भैरवीची तान आळवा.

माझी तीन वर्षाची नात शाळेत जायला खळखळ करते अन् न जाण्यासाठी कारणे सांगते. मी बाकी तिच्या कारणमिमांसेचं कौतुक करतो. उगीचच तिला दटावून बौद्धीक देण्यात काही अर्थ नाही. मग त्यावर मी एक छान उपाय शोधला आहे. आमची रात्रीची गोष्ट छबुची आणि बबुची असते. छबु ही आळशी, अस्वच्छ, हट्टी तर बबु गुणाचा पुतळा. ब्रश करणं, दूध पिणं, शाळा-अभ्यास व आज्ञाधारक आणि प्राणीमित्र मग तू कोण आहेस असं विचारलं तर सांगते मी बबु. मग न सांगता शहाण्यासारखी वागते. न चुकता ब्रश करते आणि बबुचं नामस्मरण करत सगळं सुरळित चालतं. धसपस करून गळी उतरविण्यापेक्षा मार्ग बदलला तर चांगले रिझल्टस् मिळू शकतात.

समाजात मानवता, कनवाळूपणा, दानशूरता ह्याची कदर करा. इतरांच्या सुखात पण आनंद माना. तर असं व्हा.

''कर्णापरी तू दिसतोस दाता, धर्मापरी तू धर्मतत्त्वनेता''

प्रसन्नता ही मनात निर्माण केली पाहिजे. त्यांने आत्मविश्वास वाढतो. धर्मावर पण श्रद्धा हवी पण मानवता हा धर्म याची जाण असू द्या.

दिनभुकेला दिसता कोणी, घास मुखीचा मुखे घालून
दु:ख नेत्रीचे घेता पिवूनी, नित भजतो जो मानवतेला
तोची आवडे देवाला.

आणि हाच धर्म मानलात तर तुम्ही सुमारे ६०% सुखांना निमंत्रण केलं आहे असं समजायला हरकत नाही. सुखांवर श्रद्धा हवी अन् धारणा तशीच हवी. माझ्या देवघरात माझी सुखं आहेत. मी त्यांना माझी दैवत समजतो. धर्मक्षेत्र शोधण्यात अर्थ नाही.

देव्हाऱ्यात माझे देव, त्यांनी केला प्रतिपाळ
चरणांची त्यांची धूळ, रोज लावी कपाळाला

ते देव ती सुख तुम्हांला नक्कीच आवडतील, तुम्हाला सांभाळतील अन् तुम्ही गर्जुन म्हणाल

बरबादीयोंका सोग मनाना फिजूल था।
बरबादीयोंका जश्न मनाता चला गया।

- श्री.अशोक वा.जोशी
डोंबिवली (पू.), दूरध्वनी ०२५१-२८६२००८

# संवाद लेख स्पर्धा २०१०

## स्त्री विभाग- तृतीय पारितोषिक विजेता लेख

## 'चूल आणि मूल-काल आणि आज'

खरं सांगायचं तर चूल आणि मूल-काल, चूल आणि मूल-आज' हा विषय असता तर त्याला पूर्णत्व आलं असतं, असं वाटतं कारण त्या पिढीलाच हे 'चूल आणि मूल' लागू पडतं. 'चूल आणि मूल' म्हटलं की फक्त स्त्रियांचाच सहभाग डोळ्यासमोर येतो आणि खरोखर त्या पिढीतील स्त्रियांनीच सर्वार्थाने आयुष्यभर चूल आणि मूल यात स्वतःला झोकून दिलं. या संदर्भात माझी आई माझ्या वडिलांचा किस्सा सांगायची. त्यांच लग्न झाल्या झाल्या माझ्या वडिलांचा एक गुजराथी मित्र माझ्या आईला म्हणाला की, चल बा भाभी, तुला रेशनिंगमध्ये नोकरी लावून देतो.' त्यावर आई म्हणाली, 'पण मी फक्त सातवीपर्यंतच शिकलेली आहे' तर तो मित्र म्हणाला, ते रेशनिंगमध्ये जाधवचा गाढव आणि पास्कलचा रास्कल करायला काय डिग्रीची गरज नाही.' यावर ही गोष्ट आईने वडिलांना सांगितली आणि तशी नोकरी करण्याची परवागनी विचारली. तेव्हा वडिल म्हणाले, 'उद्या बाजारातून १ डझन बांगड्या घेऊन ये, त्या मी हातात घालून घरात बसतो आणि मग तू जा नोकरी करायला.' यावर आईचे तोंड जे बंद झालं ते शेवटपर्यंत. तर मंडळी आता लक्षात आलंच असेल तेव्हाचे घरातील व्यवहार कामे ह्यांची कशी विभागणी होत होती ते. आमच्या आईने आम्हा भावंडांना तिची सर्व शक्ती, बुद्धी आणि कौशल्य पणाला लावून मोठं केलं. त्याचबरोबर घरी आमच्या आजोबांची सेवा, मे महिन्यात आणि दिवाळीच्या सुट्टीत हक्काने येणारे पाहुणे, एरवीचे लोकांचे जाणे-येणे ती सांभाळत होती. आम्ही जरा मोठे झाल्यावर तिने महिला-मंडळात जाण्यास सुरूवात केली. हे सर्व करता करता ती हौशी कलाकारांच्या कॉलनीत होणाऱ्या नाटकात कामे करत होती. एकंदरीत अतिशय समृद्ध जीवन (तेव्हाच्या व्याख्येप्रमाणे) जगत होती. आम्ही भावंडं नियमित अभ्यास करून पहिल्या 'दहा'च्या आत नंबर आणून व्यवस्थित वरच्या वर्गात जात होतो. त्यात तिला आणि वडिलांना पण समाधान होतं. तिसरा नंबर काढणारी मी पहिली का येत नाही याचं दुःख करताना ते कधी दिसले नाहीत किंवा आणखी अभ्यास कर म्हणून माझ्या मागे लागले नाहीत. घरातील स्वयंपाक आणि सणावाराची पक्वान्ने आईच्याच हातची होत होती. नोकर फक्त धुणी-भांडी व केर काढायला होता.

'चूल आणि मूल-काल' मध्ये वरील चित्रात बराच फरक पडला. तोपर्यंत मुली कमीत कमी ग्रॅज्युएटपर्यंत शिकत होत्या. हां, पण पुढे पोस्ट-ग्रॅज्युएशन करायला सक्त मनाई होती. का ? तर मग मुलगी एम्.ए./एम्.एस्.सी.पर्यंत शिकली तर जावई पी.एच.डी. शोधावा लागेल, तसेच तोपर्यंत मुलगी मोठी होईल वगैरे, वगैरे. अगदी अपवादानेच मुलींना इंजिनिअरिंग/मेडिकलला पाठवले जात असे. शिक्षण पूर्ण झाल्यावर लग्न होईपर्यंत म्हणून नोकरी करायची परवानगी मिळत होती. सर्वसाधारण ७०-८० टक्के घरातून हीच परिस्थिती होती. त्यामुळे त्याचे फारसे दुःख पण कोणाला वाटत नसे. पण मंडळी ही अशीच टाइम-पास करायला म्हणून सुरू केलेली नोकरी ह्या मुलींना जी चिकटली ती अगदी पक्की लाखेवर उमटवलेल्या 'सील' सारखी. ह्या कालच्या चूल आणि मूलाशी सुद्धा स्त्रियांचाच संबंध होता. पण फरक कसा पडला होता ते बघा - उत्पन्नात वाढ झालेली होती, विज्ञानाने पण नवीन नवीन शोध लावून विविध उपकरणे शोधून काढली होती, कुटुंब मर्यादित ठेवायचा सुजापणा सर्वत्र दिसत होता आणि आज जी स्पर्धा जीवघेणी झाली आहे त्या स्पर्धेची सुरूवात झाली होती. वेल-फर्निश्ड जरी नाही तरी स्वतःचा फ्लॅट असण्याची गरज निर्माण झाली होती. मुलगा किंवा मुलगी कोणीही असलं तरी त्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळेतच घालणं गरजेचं झालं आणि मग त्या चिरंजीव किंवा कन्येला पहिल्या नंबरनेच पास होणं सक्तीचं झालं. त्या मुलाने किंवा मुलीने इंजिनिअर किंवा डॉक्टर झालेलं स्वप्न दिसायला लागलं. त्यासाठी मग सर्वतोपरी प्रयत्न सुरू झाले. थोडा जास्त पैसा हाती आल्यामुळे मधून मधून हॉटेलमध्ये जाणे सुरू झाले. मग ते पदार्थ घरी पण करता येतात त्याचा शोध लागला. त्यामुळे मंडळी झालं काय ? तर मुलाचा अभ्यास आईने घ्यावा, नोकरीसाठी बाहेर जाते म्हटल्यावर सर्व तऱ्हेची बिले, मुलांच्या शाळेची फी भरणे, रोजची भाजी आणणे, फळे आणणे आणि हे सर्व करून घरातील कामही आईनेच करायला सुरूवात झाली. कारण मागच्या पिढीला पहात पहात मोठे झालेल्या ह्या पिढीतील पुरुषांची मानसिकता तशीच राहिली होती आणि त्याच पिढीतून मोठ्या झालेल्या स्त्रियांना सुद्धा कळलं नाही की त्या कधी ह्या चक्रव्यूहात सापडल्या. शिक्षण क्षेत्रातही तोपर्यंत कमालीचा बदल झाला होता. व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये इंजिनियरिंग व मेडिकलची खाजगी कॉलेजेस निघाली, 'पेड-सीट आणि फ्री-सीट' डोकं चक्रावून टाकेल असा धंदा सुरू झाला. आता त्या आईची खरी परीक्षा होऊ लागली. निसर्ग नियमाप्रमाणे स्त्रीची तिच्या मुलांमध्ये असलेली भावनिक गुंतवणूक तिला त्रास देऊ लागली आणि त्याच

वेळी त्याच निसर्ग नियमाप्रमाणे व्यावहारिक दृष्टीकोन असलेला बाप त्या मुलाला बाहेरच्या जगात जगायला लायक बनवू पहात होता. त्याच्या मते, त्याच्या पिढीने कुटुंबाची जबाबदारी लवकर उचलली होती. तो अजूनही त्याच्या मागच्या आणि पुढच्या पिढीची देखभाल प्रामाणिकपणे करत होता. अशावेळी त्याच्या मुलाने 'फक्त अभ्यासच' करून उत्तम यश मिळवायला काहीच हरकत नव्हती. मुलगा/मुलगी मात्र बाहेर वेगळ्याच परिस्थितीला तोंड देत होती. जगात जीव-घेण्या स्पर्धेला सुरूवात झाली होती. ८५-९० टक्के मार्कसुद्धा चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश द्यायला अपुरे होते. 'डोनेशन सीट' ह्या नवीन प्रकाराचा जन्म झाला होता आणि त्यातूनच आणखी अभ्यास, आणखी पदवी आणि आणखी पैसा' ह्या गुंत्याचा उगम झाला. भरपूर मेहनत करून मिळविलेली 'बी.ई./एम.बी.बी.एस./ बी.फार्म ची पदवी अपुरी होऊ लागली. ह्या सगळ्यात त्या आईची आपल्या मुलाची सर्वांगीण उन्नति करताना पुरती दमछाक होऊ लागली. एकेका बाईचे संपूर्ण आयुष्य म्हणजे एक कादंबरी होऊ शकेल. हे सर्व ती मुलेसुद्धा अनुभवत होती आणि त्याचवेळी आपल्या आयुष्यात यातून मार्ग कसा काढायचा याचा विचार करत होती. काहींनी ठरवून टाकले की भरपूर पैसा कमवायचा. यातूनच न संपणाऱ्या स्पर्धेचा उगम झाला आणि पुढील पिढीतील पती-पत्नी दोघेही पैशाच्या मागे धावू लागली. अगदी तो पैसा भोगायला सुद्धा वेळ न देता करियरच्या पाशात गुंतत गेली.

ह्या सर्व पार्श्वभूमीवर 'चूल आणि मूल-आज' चे चित्र फारच विविधतेने नटलेले दिसते. स्त्रियांनी स्वातंत्र्याचा पाठ मनापासून गिरवला असल्याने काही ठिकाणी चुलीजवळ पतीराजही काम करताना दिसतात आणि मुलाचा विचार करायला दोघांनाही वेळ नाही. पत्नीसुद्धा जर सकाळी ८ वाजल्यापासून घरातून बाहेर पडली असेल आणि रात्री १०-१०।। वाजता घरात पाऊल टाकत असेल तर तिचा चूल आणि मूल यांच्याशी संबंध येईल कधी आणि कसा ? त्यामुळे तिच्या चुलीवर स्वयंपाकाची बाई येऊन काम करून जाते. एकत्र कुटुंबात जर ते पती-पत्नी राहत असतील तर सासूने तिच्या चुलीची आणि मुलाची योग्य काळजी घेतलेली असते. भरपूर पगार कमावणाऱ्या त्या दोघांच्या भल्या मोठ्या फ्लॅटमध्ये दिवसभरात वेगवेगळ्या वेळी बऱ्याच मोलकरणी येऊन (स्वयंपाकाची एक, डस्टिंगसाठी एक, धुण्या-भांड्याच्या कामाची एक, मुलाला सांभाळणारी एक अशा अनेक) त्या चकचकीत घरातील चूल आणि मूल अगदी लख्ख ठेवतात. काही मुलींना जरी स्वयंपाकाची आवड असली तरी त्या केटरिंगचे क्लासेस घेण्यात जास्त मग्न असतात.

एकंदरीत काय काळाचा महिमा सर्व ठिकाणी आपला प्रभाव दाखवत असतो, त्याला चूल आणि मूल तरी अपवाद का असेल ? तेव्हा 'चूल आणि मूल-उद्या' चा विचारही न केलेला बरा नाही का ?

- अजिता एस.पाध्ये, अंधेरी (प.)

भ्रमणध्वनी - ९८२०१०१५२७

## *अभिनंदनीय*

आपले सभासद श्री. मधुकर पोतदार यांना पाथर्डी (जि.अहमदनगर) येथील 'जनाई' प्रतिष्ठानच्या वतीने त्यांनी लिहिलेल्या 'वसंत लावण्य' या चरित्र ग्रंथाला 'जनाई साहित्य पुरस्कार' मिळाला आहे.

मधू पोतदार यांची आत्तापर्यंत १२ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत त्यापैकी नऊ चरित्रात्मक ग्रंथ आहेत.

यापूर्वी त्यांना महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा धनंजय पुरस्कार (१९९८-९९) व माहीम सार्वजनिक वाचनालय उत्कृष्ट प्रक्रिया ग्रंथ पुरस्कार (२००२) असे दोन पुरस्कार मिळाले आहेत.

त्यांचा मराठी संगीतकारांचा कोश 'संगीतकार नामा' हा प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

श्री. मधू पोतदार यांचे अभिनंदन! व पुढील प्रकाशनासाठी असोसिएशनच्या शुभेच्छा!

****

आपले सभासद श्री. गणेश लक्ष्मण नायगावकर पुणे, यांची कन्या सौ.धनश्री धीरेंद्र आगटे (Aagate) यांनी रचलेल्या भक्तिगीतांचा व उत्तमोत्तम कवितांचा संग्रह 'या सुखांनो या' या नावाने घरकुल प्रकाशन, कर्वेनगर पुणे यांनी नुकताच प्रकाशित केला आहे.

जवळ जवळ ५० काव्य-गीतांचा हा संग्रह काव्य प्रेमींनी संग्रही ठेवावा असा आहे.

श्री. धनश्री आगटे यांचे हार्दिक अभिनंदन व त्यांना त्यांच्या भावी लेखनासाठी असोसिएशनच्या शुभेच्छा!

****

आपले भुसावळ (जि.जळगाव) येथील सभासद श्री. रवींद्रनाथ नारायण शेरीकर यांची पुतणी चि. हर्षा B.E.(संगणक) या परिक्षेत प्रथम वर्ग मिळवून उत्तीर्ण झाली आहे. चि. हर्षा हिचे अभिनंदन व भावी प्रगतीसाठी शुभेच्छा !

**- सेक्रेटरी**

लघुकथा

## झाले मोकळे आकाश

'बाबा, निघायचे ना दवाखान्यात?' छोट्या मीनाने खोलीत येताच विचारले. सुधीर एकदम भानावर आला. मनात विचारांचे काहूर माजले होते. खोलीत त्याच्या येराझारा चालू होत्या. मन दोलायमान झाले होते. मीनाच्या विचारण्याने त्याची तंद्री भंग पावली. ती खोलीत आली नसती तर किती तरी वेळ तो तसाच फेऱ्या मारत राहिला असता.

''आता निघूच. मी तयार होतो आणि गाडी काढतो.''

''बाबा आई बरी होईल ना हो?''

''अगं, होईल बरी! लवकर बरी व्हावी म्हणूनच तर तिला हॉस्पिटलमध्ये ठेवलयं' सुधीर तिची समजूत काढत होता.

''किती दिवस ती अजून दवाखान्यात राहणार आहे? मला अजिबात करमत नाही. तिच्याजवळ झोपायला मिळत नाही.''

''आपण तिला लवकर परत आणू. तिला तरी कोठे चैन आहे? सारख्या घरच्या आठवणी काढत असते.''

सरोजला हॉस्पिटलमध्ये दाखल करून तीन-चार दिवस झाले होते. आजपर्यंत कधीही हॉस्पिटलचे तोंड न पाहिलेली सरोज हॉस्पिटलमध्ये जाण्यास तयार नव्हती. परंतु फॅमिली डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तिला दाखल होणे भाग पडले. प्राथमिक सर्व चाचण्या करून, त्यावर औषधोपचार करूनच डिसचार्जसंबंधी डॉक्टर निर्णय घेणार होते. सुधीरने कपडे केले आणि गाडी गॅरेज बाहेर काढली.

आईऽऽ! सरोजला बघताच मीनाने हाक मारली.

''अगं हळू बोल! हॉस्पिटल आहे हे! लोकांना त्रास होतो.''

''आई मोठी माणसं खोटं बोलत नाहीत ना?'

''नाही गं! काय झालं?''

''मग तू कशाला सांगितलंस, बाहेर जाऊन येते म्हणून? घरी कधी येणार?''

''डॉक्टरांनी परवानगी दिली की येणार हं !''

''मी सांगते डॉक्टर काकांना आईला लवकर घरी पाठवा.''

''अगं आई लवकर घरी येणार आहे. सुधीरने पुन्हा तिची समजूत काढली.''

''सारखी म्हणत होती मला आईकडे घेऊन जा. पण सुरूवातीस कोणासही भेटण्यास डॉक्टरांनी परवानगी दिली नव्हती. सारखा तुझाच ध्यास. फार जीव आहे तिचा तुझ्यावर!''

''फारच जीव आहे ग तिचा तुझ्यावर'' या सुधीरच्या शब्दांवर सरोज एकदम बेचैन झाली. पुन्हा पुन्हा तेच शब्द खोलीच्या चारही कोपऱ्यातून तिच्या कानावर आदळू लागले. अतीव वेदनेने ती व्याकूळ झाली. अंग घामाने ओलेचिंब झाले. एक शल्य मनाला सारखे टोचण्या देत हाते. तिला काही सुचत नव्हते. डोक्यावर पंखा चालूच होता. पंख्याच्या फेऱ्यातच तिचे मन जुन्या आठवणीत फेर धरू लागले.

सरोज आईवडीलांची एकुलती एक मुलगी. पहिली दोन अपत्ये जन्मत:च दगावली. नंतरची ही सरोज. दिसायला साधी,नेटकी राहणारी. निरनिराळ्या वक्तृत्व स्पर्धेत बक्षिसे मिळवून कॉलेजमध्ये नाव मिळवलेली. अशाच एका स्पर्धेत सुधीर तिचा प्रतिस्पर्धी म्हणून सामोरा आला. त्या स्पर्धेत पहिले पारितोषिक सरोज व सुधीर यांना विभागून देण्यात आले. त्यावेळेपासूनच सरोज सुधीरकडे नकळत आकर्षली गेली.

सुधीर मध्यमवर्गीय कुटुंबातील. अभ्यास हुषार. बी.एस्.सी. झाल्यावर एका खाजगी कंपनीत चांगल्या पगारावर नोकरी. सरोजचा आणि सुधीरचा प्रेमविवाह. त्यांच्या संसारवेलीवर सुंदरसे फूल, जास्वंदी तिचे नाव. दृष्ट लागावी असा संसार.

एकदा संध्याकाळी पार्कमध्ये दोघेही फिरायला गेले असताना तिने आपणहून विषय काढला होता.

''सुधीर! माझं सध्या कशातच लक्ष लागत नाही. जास्वंदीच्या पाठीवर दिवस आहेत मला.''

''प्लेझंट सरप्राईज! अगं त्यात बेचैन व्हायला काय झालं! तुला यात आनंदच वाटायला हवा!'

'तुला काय म्हणायला होतं? आम्हा बायकांनाच सगळं भोगावं लागतं. मला दूसरे मूल नको आहे! एक जास्वंदी आहे तेवढी पुरे!'

''अगं आपल्याला काय कमी आहे? चांगलं घर आहे, नोकरी चांगली आहे. मग तू कशासाठी नाही म्हणतेस?''

''सुधीर तुला आठवतय ना? जास्वंदी दोन वर्षांचीच असताना तिच्या हृदयाचे ऑपरेशन केलेलं. किती पैसा खर्च केला, किती मानसिक टेन्शन, यातना आपण भोगल्या ते ! मला आता जास्त जबाबदारी नको आहे.''

''हो! चांगलं आठवतयं मला. आपण सगळ्यांनीच खूप सोसलं. अगं पण तू त्या भूतकाळातील गोष्टी पुन्हा पुन्हा आठवून स्वत:ला का दु:खी करून घेतेस? जास्वंदी त्यातून सुखरूप बाहेर पडली हा वर्तमानातील आनंद, हे समाधान, तू त्या भूतकाळातील आठवणींनी का झाकाळून टाकत आहेस? आणि या जगात नव्याने प्रवेश करणाऱ्या निरागस बाळाच्याही बाबतीत असंच काहीतरी होईल असं का गृहीत धरतेस?''

''मी तुला एकदा सांगितलं ना? मला आता जास्त जबाबदारी नको म्हणून?''

''मी घेतो ना जबाबदारी, मग तर झालं?''

''तुम्ही पुरूष सर्व असंच म्हणता! सर्व करावे लागते ते बायकांनाच!''

''मग तू काय करायचं ठरवलं आहेस?''

''मला दूसरं मूल नको आहे. मी होऊ देणार नाही. अबॉर्शन करून घेणार आहे मी.''

''काऽय? अबॉर्शन? एक भृणहत्या? एक पाप? सरोज तू बोलतेस हे? अगं आपल्याच आईवडीलांनी असं केलं असतं तर.... विचार कर. हे जगच आपण पाहू शकलो नसतो. फार सुंदर आहे हे जग. हे डोंगर दऱ्या, उंच उंच वृक्ष, हिरवी शेते, झुळझुळ वाहणारे झरे, आकाशाच्या प्रांगणातील लखलखणारे हे असंख्य तारे, फुलांच्या सुगंधाची दूरवर पखरण करणारे हे वारे. निसर्ग किती सुख देतो आपल्याला. या अनाघाती सौंदर्याचा आनंद नव्याने या जगात येण्यासाठी आसुसलेल्या त्या निरागस जीवाला घेऊ दे की? काय गुन्हा केलाय ग त्यानं? तू पुन्हा नीट विचार कर. तू जो निर्णय घेशील तो मला मान्य आहे.''

''मी पूर्ण विचार करूनच हा निर्णय घेतला आहे.''

''ठिक आहे.''

दोन दिवसांनी सुधीरला बरोबर घेऊन सरोज त्यांच्या नेहमीच्या डॉक्टरांकडे प्रकृति दाखवण्यास गेली. तिने आपला निर्णय, डॉक्टरांनी निदान करण्याअगोदरच डॉक्टरांना सांगितला.

या बाबतीत दोघांचीही संमति आहे याची त्यांनी सुधीरला विचारून खात्री करून घेतली. डॉक्टरांनी दिलेल्या गोळ्या, इंजेक्शनस्चा प्रभाव पडला नाही. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार आता अबॉर्शन करणे धोक्याचे होते. त्यामुळे तिचा नाईलाज झाला होता आणि ही छोटी मीना जन्मास आली होती. तिच्या मनाविरूद्ध.

आज मीना जवळ जवळ सात वर्षांची झाली होती. आईप्रमाणेच सावळी पण चुणचुणीत होती. शाळेतील स्नेहसंमेलनातील प्रसंग - तिला बरीच बक्षिसे मिळाली होती. हॉलमध्ये सर्वजण मीनाचे कौतुक करत होते.

'खूपच हुषार आहे तुमची मुलगी! अशी मुलगी पोटी जन्माला येणे म्हणजे भाग्यच नाही का? हे आणि अशाच प्रकारचे संवाद तिच्या कानावर येत होते. सरोज काहीच बोलली नाही. नुसते ऐकून घेत होती.

''आई मला एवढी बक्षिसे मिळाली, शिक्षकांनी शाबासकी दिली. पण तू काहीच बोलली नाहीस'' मीनाचे हे शब्द तिला आठवले आणि ''फारच जीव आहे मीनाचा तुझ्यावर'' या सुधीरच्या शब्दांनी पुन्हा कटू स्मृति ताज्या होऊन समोर आल्या. त्यांनी तिला आता पुन्हा बेचैन केलं होतं, अस्वस्थ केलं होतं.

समोर मीना बसली होती. 'तू लवकर बरी होऊन घरी परत ये'' म्हणून हटूनच बसली होती.

''डॉक्टर प्लीज!'' डॉक्टरांची व्हिजीट झाल्यावर सुधीरने त्यांना थांबवले. ''सरोजचे रिपोर्ट आले का? काय निदान झाले?''

''अरे बरे झाले आपण विचारले ते. मी सांगणार होतोच. एका किडनीला प्रॉब्लेम आहे. काळजीचे कारणनाही. एक-दोन दिवसातच ऑपरेशन करू.''

''काय म्हणाले डॉक्टर?''

''काळजीचे कारण नाही. किडनीचा जरा प्रॉब्लेम आहे. ऑपरेशन अटळ आहे. केल्यावर सर्व ठीक होईल. तू उगीचच टेन्शन घेऊ नकोस.''

छोटी मीना खोलीच्या बाल्कनीत गेलेली पाहून सरोज म्हणाली, ''सुधीर त्या गोष्टीची आठवण आली की जीव घुसमटतो. मीनाच्या जन्मालाच मी विरोध करत होते. पण शेवटी माझा पराभव करून ती जन्माला आली. हे मी सहन करू शकत नव्हते. मी तिच्यावर रागवायची, चिडायची, कधी कधी मारायची सुद्धा! तीच मीना घरी कधी येणार आई विचारणारी, 'मीनाचा जीव आहे तुझ्यावर' हे तुझे शब्द.. मन पुन्हा अस्वस्थ होतं.'

''तू हा विचार डोक्यातून काढून टाक पाहू! भूतकाळातील कटू आठवणींना का कवटाळून बसतेस? प्राप्त परिस्थिती काय आहे हे बघ! मीना किती गोड आणि हुषार मुलगी आहे हे बघ. त्याचा स्वीकार कर.

सुधीरजवळ आज मन खुलं केल्यामुळे सरोजला आज खूपच फ्रेश वाटत होतं. काळ्याकुट्ट ढगांनी वेढलेलं आकाश थोड्याच वेळात निळेशार, निरभ्र होतं, तसंच तिचं मन एकदम मोकळं झालं होतं. ती बरीच उल्हसीत आणि तरतरीत दिसत होती.

ऑपरेशनची वेळ सकाळी दहा वाजताची. सुधीर, मोठी जास्वंदी आणि मीना हॉस्पिटलमध्ये पोहोचले. ऑपरेशनची तयारी जय्यत होती. सिस्टरने सरोजला ड्रेस घालायला दिला. लगेचच वॉर्ड बॉईजनी स्ट्रेचर आणले. तिने आर्त नजरेने सुधीरकडे, तर एकदा मुलींकडे बघितले. ती स्वत:ला सावरू शकली नाही. तिने अश्रूंना वाट करून दिली. सुधीरने नजरेनेच तिला धीर दिला. वॉर्ड बॉईज स्ट्रेचर घेऊन ऑपरेशन थिएटरच्या दिशेने निघाले.

''आई तू लवकर बरी हो आणि घरी ये!''

''हो मीना! मी बरी होणार आहे. घरी येणार आहे तुझ्यासाठी.''

स्ट्रेचर ऑपरेशन थिएटरमध्ये गेल्यावर दार एकदम बंद झाले. छोटी मीना पुन्हा पुन्हा वळून त्या दारकडे टक लावून पहात होती.

- प्रभाकर गुपचूप, पुणे
मो. ९८८१५७९४९९

## जामातो दशम ग्रहः

दि. २० एप्रिल २०१०

श्री.दत्तूकाका सराफ

यांना स.न.वि.वि.

आपल्या १८० वर्षांची परंपरा असलेला फलटण येथील सराफी पेढीने गेल्या २ वर्षांपासून पुण्यात शाखा उघडली व आपण पुणेकरांच्या सेवेत रूजू झालात. आपले अभिनंदन ! मी आपल्या या सराफी व्यवसायास सुयश चिंतीतो. आपल्याकडील सोन्याच्या दागिन्याच्या शुद्धतेचे आपण ग्वाही देत आहात. परंपरा शुद्धतेची, झळाळी नाविन्याची । अर्थात हे सर्व आम्ही रेडिओच्या माध्यमातून ऐकत असतो. रात्री १०॥ ला आपण प्रायोजित करीत असलेल्या जुन्या हिंदी चित्रपटातील मधुर गाण्यांच्या कार्यक्रम आम्ही न चूकता ऐकत असतो. कारण ''जुनं ते सोनं'' ही म्हण मात्र ह्यागोड गाण्यांनी खरी करून दाखविली आहे. त्या कार्यक्रमाचा आम्ही पुरेपूर लाभ घेत असतो, पण आपल्या सराफी दुकानातील शुद्ध सोन्याच्या दागिन्यांचा आम्ही लाभ घेवू शकत नाही.

आपण प्रायोजित करीत असलेल्या कार्यक्रमाने आमचे कान जरी तृप्त होत असले व मन समाधानी होत असले तरी आजचे सोन्या-चांदीचे भाव बघून आमचे डोळे पांढरे होतात व मन खट्टू होते, असो आपण म्हणाल की मी हे काय चऱ्हाट वळीत बसलो आहे, तर मी मुख्य मुद्याकडे वळतो.

मी स्टेट बँकेतून स्वेच्छा निवृत्ती घेतलेला एक पेन्शनर आहे. आपण म्हणाल की, ''तुम्ही स्वेच्छा निवृत्ती का घेतली ? तर तीही एक गंमतच झाली, पण ती आता येथे सांगत नाही,नंतर केव्हा तरी...

विशेष म्हणजे सध्या आमची पेन्शन वाढीसंबंधी कोर्टबाजी चालू आहे. पेन्शन वाढेल की नाही हे आज सांगता येणार नाही, पण महागाईमुळे खर्च मात्र वाढत आहे.

तर मूळ मुद्दा असा की दि. १५ एप्रिल २०१० पासून हिंदु कालगणनेनुसार वैशाख-अधिक मास सुरू झाला आहे आणि त्या दिवसापासून आपल्या सराफी पेढीने एक नविन जाहिरात रेडिओवरून सुरू केली आहे ती अशी -

**''परंपरा शुद्धतेची, झळाळी नाविन्याची''**

**खास अधिक मासानिमित्त आपल्या लाडक्या जावयाला सोन्या-चांदीचे आकर्षक दागिने ''अधिक मासाचे वाण'' म्हणून भेट द्या ! दत्तूकाका सराफ - ''टिंग टिंग''**

आपली ही जाहिरात ऐकल्यापासून आमचे पोटात गोळा उठला आहे व झोपही उडाली आहे. निवृत्ती होता होता मी आमच्या पंचकन्यांची लग्ने व्यवस्थित लावून दिलीत. जमलेल्या प्रॉव्हिडंट फंडातून पैसे काढून दोन मुली उजविल्या. तिसरीसाठी आमच्या एम्.एस्.पटेल सोसायटीचे कर्ज काढले. चौथीचे लग्न पुणे सोसायटीच्या कर्जातून मार्गी लावले. शेवटच्या शेंडेफाळाचे, मिळालेल्या ग्रॅच्युटीच्या रकमेतून पार पाडले. पहिल्या मुलीच्या लग्नानंतर प्रत्येकीच्या लग्नात आधीच्या जावयाचे मानपानही व्यवस्थित केलेत. कोठेही नाव ठेवायला जागा ठेवली नाही.

अशा वेळोवेळी उपलब्ध होत गेलेल्या आर्थिक तरतूदीतून शुभ कार्ये पार पाडली व मी कृतकृत्य झालो. सर्व मुली सुखाने नांदत आहेत. मी काळजीमुक्त झाल्याने सुखाने झोपत होतो. पण आपली जाहिरात सुरू झाली आणि माझी झोप उडाली.

जावई हा दहावा ग्रह असतो असे म्हणतात. ''जामातो दशम ग्रहः'' असं संस्कृत वचन आहे आणि मला तर एक नाही पाच जावई आहेत. तसा मी सुद्धा एक जावईच आहे, म्हणजे आमचे सासरेबुवा कधीच आमचे सासर बंद करून वर रवाना झालेले आहेत. सासुबाई अजून हयात आहेत. आमचा मेव्हणा म्हणजे आमच्या सौं.चा धाकटा भाऊ दरवर्षी न चूकता ३/४ महिन्यांसाठी आमच्या सासूबाईंना आमचेकडे थोडासा चेंज वा हवापालट या निमित्ताने सोडून जातो. हवापालट हा सासूबाईंसाठी असतो की त्साला स्वत:साठी हवा असतो हे मला अजूनही कळलेले नाही, असो. हे पुन्हा माझे विषयांतर झाले. तर मुख्य मुद्दा असा की, आपली वरील जाहिरात जर का माझ्या जावयांनी ऐकली तर यास अधिक मासाच्या वाणा निमित्ताने माझी अल्प पुंजी संपुष्टात येऊन माझी आर्थिक परिस्थिती आपल्या सरकार सारखी दिवाळखोरीची होणार आहे. वास्तविक ऋण काढून सण साजरा करू नये असे म्हणतात.

सध्या माझी ग्रहस्थिती जरी बरी असली तरी, म्हणजे ह्या महिन्यात कालनिर्णयात साळगावकर म्हणतात, ''ताण-तणाव वाढविणारा हा महिना आहे. आर्थिक विवंचना वाढतील.'' पुढे ते म्हणतात, ''आर्थिक परिस्थितीचा अंदाज घेऊनच नवीन योजना आखा.'' पण जामात म्हणजे जावई हा दशम ग्रह म्हटला जातो. हा ग्रह सासऱ्याच्या राशीला केव्हा वक्री येईल हे कुणाही ज्योतिषविद्या विभूषिताला सांगता येणार नाही.

अधिक महिना दर चौथ्या वर्षी येत असतो व त्या महिन्यात जावयांना अधिक मासा निमित्त काहीतरी भेट वस्तू म्हणजे 'वाण' द्यायचे असते हेच आमच्या आधुनिक विचारांच्या जावयांना माहित नाही. परंतु आपण 'अधिक मासाचे वाण' अशी जाहिरात करून हे वाण वाटपाचे मोहोळ उठविण्याचा प्रयत्न करीत आहात. म्हणून मी आपणास हे पत्र लिहित आहे. तरी कृपा करून ही जाहिरात ताबडतोब बंद करावी. आमच्या खर्चावर मर्यादाआणून आमची उरली सुरली पुंजी सुरक्षित रहाण्यासाठी मदत करावी ही नम्र विनंती. कळावे लोभ असावा.

आपला नम्र,

आ.ता.पुरेकर (आनंदराव तानाजी पुरेकर)

**- वसंत धुपकर**, दूरध्वनी -०२०/२५३९४४७२

## ज्ञानेश्वरांचे पसायदान

महाराष्ट्रातील प्राय: सर्वच ज्येष्ठ साहित्यिक, संशोधक व समीक्षकांनी 'पसायदाना'ची थोरवी मुक्तकंठाने गायिलेली आहे. विख्यात समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी हे करूणा, भक्ति आणि उदात्तता यांचा उत्कट आविष्कार करणारं ज्ञानेश्वरांचं पसायदान हे महाराष्ट्राचं राष्ट्रगीत असल्याचं मानतात.

डॉ.यशवंत पाठक पसायदानाला विश्वगीताच्या परमोच्च स्थानी बसवितात. ज्ञानेश्वरांचं पसायदान सफल होईल तेव्हा स्वर्ग धरेला चुंबायला खाली लवेल आणि पृथ्वीचा स्वर्ग होऊन तो खऱ्या अर्थाने अमृतमय होईल असा आत्मविश्वास डॉ. व. दि. कुलकर्णी व्यक्त करतात. अरविंद मंगरूळकर व वि. मो. केळकर यांना पसायदानात आदर्श समाजाची कल्पना व्यक्त झालेली असून ती भव्य, सार्वजनीन, सार्वकालिक उदात्त असल्याचा साक्षात्कार होत आहे. डॉ. उषा देशमुख यांच्या मते ज्ञानेश्वरांचे वैश्विक मन ज्ञानेश्वरीत प्रतिबिंबित झालेले आहे तर त्याचा परमोच्च आविष्कार पसायदानात घडतो. सखोल चिंतनातून व गाढ अभ्यासातून व्यक्त झालेले मान्यवरांचे हे सर्वच विचार आपल्याला अंतर्मुख बनवून दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक होतील.

कृष्णार्जुन संवाद अर्थात् भगवद्गीता हे उपनिषदांचे सार आहे. ते सर्व शास्त्रांचे माहेर आहे. राजहंसांनी सेवन करावे असेच हे सरोवर आहे आणि गीतेचा १८ वा अध्याय हा कळस आहे असं स्वत: ज्ञानेश्वर महाराज (जे स्वत: निवृत्तीचा दास म्हणवतात) यांनीच स्पष्टपणे म्हटले आहे -

जे उपनिषदांचे सार । सर्व शास्त्रांचे माहेर । परमहंसी सरोवर । सेविजे जें ।। १७८६

तिथे गीतेचा कळशु । संपूर्ण हा अष्टादशु । म्हणे निवृत्तिदासु । ज्ञानदेवो ।। १७८७

तेव्हा गीतेचा अठरावा अध्याय म्हणजे 'कळसाध्याय' असून हा अध्याय म्हणजे जणू 'एकाध्यायी साररूप गीता' च होय. गीतेत या अध्यायाचे एकूण ७८ श्लोक आहेत तर त्यांचं विस्तृत निरूपण करणाऱ्या ज्ञानेश्वरी ग्रंथात १७८८ ओव्या आहेत. या कळसाध्यायाच्या कळसाचं सर्वात उंच टोक किंवा शिखर म्हणजे पसायदानाच्या नऊ ओव्या. आपले गुरू श्री निवृत्तीनाथ यांच्याविषयी 'ऐसा विश्वात्मक माझा । श्रीगुरूनिवृत्तीराजा ।' असं पराकोटीच्या आदरभावाने संबोधून या 'विश्वात्मक देवा' पाशी ज्ञानेश्वर महाराज पसायदानाची-प्रसादाची मागणी करीत आहेत.

अठरावा अध्याय हा ज्ञानेश्वरीचा उपसंहार तर पसायदान हा या ज्ञानेश्वरीरूपी धर्मसंकीर्तनाचा आणि वाग्यज्ञाचा निष्कर्षरूप होतो. ज्ञानेश्वरी ही भावार्थदीपिका आहे आणि तिचा भावार्थ या पसायदानात एकवटलेला आहे.

श्रीज्ञानेश्वर महाराजांचं पसायदान हे त्यांनी आपला ग्रंथराज ज्ञानेश्वरीरुपी ९००० ओव्यांचा महान् 'वाग्यज्ञ' पूर्ण झाल्यावर गुरू श्रीनिवृत्तिनाथ यांच्यापाशी मागितलेलं प्रसादरुपी दान आहे. हे प्रसादाचं दान अर्थात् 'पसायदान' अवघ्या नऊ ओव्यात त्यांनी शब्दबद्ध केले आहे. ज्ञानेश्वरीच्या शेवटच्या म्हणजे १८ व्या अध्यायातील ओवी क्रमांक १७९३ ते १८०१ या त्या नऊ ओव्या आहेत. असं म्हणतात की ज्ञानेश्वरांनी केवळ या नऊ ओव्यात पसायदान लिहिलं असतं तरी तेवढ्यावरूनही त्यांची थोरवी सिद्ध झाली असती. एवढं त्या पसायदानाचं विश्वव्यापी व विश्व कल्याणकारी स्वरुप आहे. त्या पसायदानात महाकवीची प्रतिभाच जणू एकवटलेली आहे.

ज्ञानेश्वरांच्या पसायदानाचा प्रारंभच मुळी 'आतां विश्वात्मकें देवे । येणें वाग्यज्ञे तोषावें।' या ओळीने झालेला आहे. 'विश्वात्मक देव' कोणाला उद्देशून ज्ञानेश्वरांनी म्हटलं आहे? देव जरी विश्वात्मक-विश्वव्यापी असला तरी त्या स्थानी प्रत्यक्ष सद्गुरू श्रीनिवृत्तिनाथच ज्ञानेश्वरांना अभिप्रेत आहेत. 'ऐसा विश्वात्मक माझा । श्रीगुरू निवृत्तिराजा।' असं ते निवृत्तिनाथांना उद्देशून स्पष्टपणे म्हणतात. परब्रह्म म्हणजे 'निर्गुण परमेश्वर' आणि गुरू म्हणजे 'सगुण परमेश्वर' होय. आपल्या गुरूंना निवृत्तीनाथांना ते ज्ञानदृष्ट्या शिवशंकरच मानतात. म्हणून 'विश्वेशरावो' असाही त्यांचा ज्ञानेश्वर उल्लेख करतात. 'आता' म्हणजे 'ज्ञानेश्वरी' या महान ग्रंथाची यशस्वी रचनापूर्ती झाल्यावर अपूर्व समाधानी वृत्तीने अत्यंत नम्रपणे ज्ञानेश्वर आपल्या गुरूने या वाग्यज्ञाने संतुष्ट व्हावे अशी प्रार्थना करतात आणि आपल्या गुरूकडून कृपाप्रसादाची अपेक्षा करतात.

'विश्वात्मक देव' या संकल्पनेविषयी डॉ. यशवंत पाठक म्हणतात की सबंध ज्ञानेश्वरीत 'विश्वात्मके देवे' ही व्यापक जाणीव सतत येते. ज्ञानदेव बोलतात तेही विश्वाशी. अनुभूती घेतात तीही वैश्विक. हे संपूर्ण विश्वच त्यांना आपले घर वाटते. ही व्यापकपणाची जाणीव पसायदानाला अवकाश देते. 'हे विश्वचि माझे घर', 'अगा विश्वैक धामा', 'विश्व हे मोहरे लावावे' अशी कितीतरी वचने सांगितली आहेत. असा ज्ञानदेवांच्या अनुभूतीचा आवाका विश्वात्मक आहे. म्हणून त्यांचा देवही विश्वात्मक आहे. अर्थात् देवाविषयीची इतकी व्यापक व सर्वस्पर्शी धारणा ज्ञानेश्वरांची असली तरी पसायदानात संबोधिलेला विश्वात्म देव म्हणजे साक्षात त्यांचे ज्येष्ठ बंधू नि गुरू श्रीनिवृत्तिनाथ हेच होत ही गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे.

तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ।' अशी श्री ज्ञानेश्वर महाराज आपल्या गुरूपाशी याचना करीत आहेत; पण 'विश्वात्मक' असलेल्या 'सद्गुरू श्री निवृत्तीनाथांपाशी मागितलेल्या या दानाचं-पसायदानाचं-प्रसादाचं स्वरुप काय

आहे? हे मागणं व्यक्तिगत वा वैयक्तिक पातळीवरचं आहे का? तर ते तसं मुळीच नाही. ज्ञानेश्वर महाराज स्वत:साठी स्वत:पुरतं काहीच मागत नाहीत. तर विश्वकल्याणाचं ध्येय त्यांच्यापुढे आहे आणि म्हणूनच ते 'खळांची व्यंकटी सांडो' असं प्रार्थितात. म्हणजे खळांना किंवा दुष्ट प्रवृत्तीच्या माणसांना नष्ट करण्यास नव्हे तर त्यांच्यातील खलवृत्ती-दुष्ट प्रवृत्ती नष्ट व्हावी इतकंच नव्हे तर त्यांच्यात सत्प्रवृत्तींचा उद्‌भव व्हावा, त्यांच्या अंगी चांगली वृत्ती बाणावी व परिणामी सत्कर्माकडे त्यांचा ओढा वाढावा अशी प्रार्थना ते करतात. कारण असं झालं तरच एकमेकांमध्ये प्रेमभाव-मैत्र वाढीस लागेल आणि तसंच व्हावं अशी ज्ञानेश्वर इच्छा व्यक्त करतात - 'भूता परस्परें पडो। मैत्र जीवांचे।' या शब्दातून स्पष्ट करतात. केवळ माणसा-माणसांतीलच नव्हे तर सर्व प्राणीमात्रांतील वैर नष्ट होऊन त्यांच्यातील जिवाभावाची मैत्री - मैत्रभाव वाढावा असा ज्ञानेश्वरांचा विशाल दृष्टिकोन आहे, ही त्यांची मागणी प्रार्थना आहे. या ठिकाणी संत तुकाराम महाराजांची तीव्रतेने आठवण होते. त्यांनी हीच भावना 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' या अगदी समर्पक शब्दांत व्यक्त केलेली आहे. संतसज्जनांचा विशाल भावनिक दृष्टिकोनच प्रातिनिधिक स्वरूपात संत तुकारामांच्या शब्दांतून प्रगट झालेला आहे.

जीवमात्रातील पापभावनेचा अंधार, पापी वृत्ती नष्ट व्हावी आणि सर्व जगतात स्वधर्मरूपी सूर्य उदयाला यावा अशी इच्छा 'दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।' या शब्दात ते व्यक्त करतात. येथे स्वधर्म याचा अर्थ 'धर्मपंथ' असा संकुचित नाही, तर 'स्वकर्तव्य' असाच ज्ञानेश्वरांना अभिप्रेत आहे. सर्वात्मक ईश्वराची पूजा स्वकर्मकुसुमांनी करावयाची असते असं ते म्हणतात. येथे 'पाहो' याचा अर्थ पाहणे असा नसून 'पहाट होणे', 'प्रकाशणे' असा आहे.

विश्वामध्ये स्वधर्मसूर्याचा प्रकाश पडण्यासाठी 'स्व' व्यापक होणे अवश्य आहे. पापाचा अंधकार नष्ट होण्यासाठी स्वधर्माचा प्रकाश पसरणे, स्वधर्मरुपी सूर्य उगवणे, स्वधर्म सूर्याची पहाट होणे आवश्यक आहे. 'स्वधर्मु जो बापा । तोचि नित्य यज्ञु जाण पां । म्हणोनि वर्ततां येथ पापा । संचारू नाही।।' असं प्रत्यक्ष ज्ञानेश्वर महाराजांनीच ज्ञानेश्वरीमध्ये म्हटले आहे. आपल्या कर्तव्याची योग्य जाणीव असणं आणि त्याचं कालानुरूप आचरण होणं प्रत्यक्षात घडलं की प्रत्येकाची इच्छा-आकांक्षा फलद्रूप होईल. स्वधर्मानुसार आचरण अर्थात् स्वत:च्या कर्तव्याचं पालन प्रत्येकाकडून झाल्यास विश्वकल्याणाचं ध्येय साध्य होईल.

या विश्वात विशिष्ट धर्मपंथाचा नव्हे तर प्रत्येकाच्या कर्तव्यसूर्याचा उदय होवो अशी प्रार्थना ज्ञानेश्वर विश्वदेवापाशी अर्थात् गुरू श्री निवृत्तिनाथांपाशी करीत आहेत. कारण असं झालं तरच 'जो जे वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।।' या इच्छेची पूर्ती सर्व जगताला कल्याणप्रद होईल.

या विश्वात सर्वत्र सर्व प्रकारच्या मांगल्याचा, शुभ गोष्टींचा सातत्याने वर्षाव करणारी ईश्वरावर-देवावर निष्ठा-विश्वास असणाऱ्या संत-सज्जनांच्या झुंडी-समुदाय निर्माण होवोत आणि ते सर्व प्राणीमात्रांना 'अनवरत' म्हणजे वारंवार-सातत्याने भेटत राहोत, त्यांना मार्गदर्शन करीत राहोत म्हणून 'वर्षत सकळमंगळी । ईश्वर निष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।।' या ओवीद्वारे ज्ञानेश्वर प्रार्थना करीत आहेत. मंगलाचा वर्षाव होण्यापूर्वी अमंगळाचा वाईट गोष्टींचा नाश होणं अवश्य आहे. अमंगलाचा नाश आणि मांगल्याचा वर्षाव झाल्यावर समाजाचं उन्नयन होऊन विश्वाचं कल्याण साधेल हेच श्रीज्ञानेश्वर महाराजांना अभिप्रेत आहे. विश्व कल्याणाचे भव्य ध्येय गाठण्यासाठी ईश्वरनिष्ठांची, संत सज्जनांची मांदियाळी किंवा समुदायच हवेत. ते एका व्यक्तीचं काम नव्हे.

ही ईश्वरनिष्ठांची मांदियाळी सुदैवाने श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या काळात अस्तित्वात होती आणि ती साक्षात् ज्ञानेश्वर माऊलीच्या प्रभावाने नि प्रयत्नांनीच निर्माण झालेली आपल्याला आढळते. संत नामदेव, परिसा भागवत, नरहरी सोनार, गोरा कुंभार, चोखा मेळा, जनाबाई, सेना न्हावी, सावतामाळी, कान्होपात्रा... किती नावे घ्यावीत? ही सर्व संत सज्जन मंडळी म्हणजे ईश्वरनिष्ठांची मांदियाळीच नव्हे काय? हे सर्व ईश्वरनिष्ठच समाजाला सन्मार्गाला लावण्याचे, विधायक कामात गुंतविण्याचे महत्कार्य सातत्याने करीत असतात.

पसायदानातील 'चला कल्पतरूंचे अरव । चेतना चिंतामणींचे गाव । बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।' या पाचव्या ओवीमध्ये ज्ञानेश्वर महाराज ईश्वर निष्ठांचे संतमंडळींचे मोठेपण अनेक उपमांच्या साह्याने समजावून सांगत आहेत. संत सज्जनांना ते कल्पतरू म्हणजे इच्छा पूर्ण करणारे आणि त्या कल्पतरूंचे 'अरव' म्हणजे समुदाय अर्थात् उद्यान आहेत अशा शब्दांत गौरवितात. पण कल्पतरू हे एकाच जागी स्थिर असतात तर संतमंडळी गतिमान म्हणजे चालते-बोलते आणि समाजात येऊन मिसळणारे जणू समाजाचे सेवक व उद्धारकर्ते असतात. संतांना ते चिंतामणी रत्नाची उपमा देतात. पण संत सज्जन हे चैतन्यरुपी चिंतामणी असल्यामुळे ते अशा अनेक चिंतामणींचे समुदाय-गावचे गाव आहेत. जिथे गेल्यावर दुर्लभ असे आत्मसुख प्राप्त होते. संत सद्‌गुरू अज्ञानाचे आवरण दूर करून आत्मज्ञानाचा-आत्मधनाचा लाभ करून देतात. पीयूष म्हणजे अमृत. संत म्हणजे अमृताचे जणू सागरच. संतांचे बोल परिणामकारक व प्रभावी असतात. त्यांच्या बोलण्यानुसार वर्तन केल्यास अमृततत्त्व प्राप्त होते.

संतांचे वर्णन पुढील ओवीतही ज्ञानेश्वर करीत आहेत.

'चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वाही सदा सज्जन। सोयरे होतु ।।' संत हे लांछन-डाग नसलेला निष्कलंक-लांछनरहित चंद्राप्रमाणे असतात. तसेच सूर्याप्रमाणे तेजस्वी असतात. पण तापदायक मात्र नसतात. सर्वांच्या अंत:करणातील अज्ञानरुपी अहंकार ते नाहीसा करतात. ही सज्जन वृत्तीची संतमंडळी सदैव सोयरे-जवळचे नातेवाईक, शुभचिंतक बनतात. ज्ञानेश्वरांनी येथे संतांना चंद्र-सूर्याची उपमा देऊन भाषेतील व्याकरणाचा नवाच अलंकार घडविलेला आहे. तो शुद्धालंकार. जेथे उपमेयामुळे उपमान शुद्ध, उन्नत, श्रेष्ठ होते तेथे शुद्धालंकार होतो. ज्ञानेश्वरांची ही मराठीला अनोखी देणगी आहे.

ज्ञानेश्वर पुढील ओवीत म्हणताहेत - 'किंबहुना सर्व सुखी। पूर्ण होऊनि तिन्ही लोकीं । भजि जो आदिपुरूषीं । अखंडित।।' यापेक्षा अधिक काय मागावे? स्वर्ग, मृत्यू व पाताळ या तिन्ही लोकातील सर्व प्रकारची सुखे सर्व लोकांना प्राप्त व्हावी आणि त्यांनी पूर्णत्वास जावे. त्यांना शाश्वत सुखाचा लाभ व्हावा आणि आदिपुरूष जो नारायण-भगवान ईश्वर-परमात्मा, त्याच्या ठायी अखंड भक्तिभाव निर्माण व्हावा आणि सर्व प्राणिमात्रांचा उद्धार व्हावा. ज्ञानोत्तर भक्ती ही पराभक्ती. ती अखंडच करायची असते. हा अनुभव प्रत्यक्षच घ्यायचा असतो.

आपल्या पसायदानाची समाप्ती करताना ज्ञानेश्वर महाराज 'आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजये । होआवें जी ।। या ओवीद्वारे इच्छा व्यक्त करतात की गीतेत व ज्ञानेश्वरी ग्रंथाद्वारे सांगितलेले तत्त्वज्ञान जाणून जे लोक त्यानुसार आचरण करतात व आपल्या जीवनात उतरवितात त्यांना या भूतलावर दृश्य व अदृश्य म्हणजे ऐहिक व पारलौकिक अशा सर्व विषयांवर विजय प्राप्त होवो केवळ साधकच नव्हे तर सर्व विश्व परमोच्च अशा आनंदरूप स्थितीत राहो असे पसायदान ज्ञानेश्वर महाराज आपल्या सद्गुरूंजवळ श्रीनिवृत्तिनाथांजवळ मागतात आणि.....

'येथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल दान पसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ।।'

ज्ञानेश्वरांची ही प्रार्थना-इच्छा-प्रसाद यांची मागणी ऐकून सद्गुरू श्री निवृत्तीनाथ-ज्यांचा उल्लेख 'विश्वेशरावो' असा केला आहे - तात्काळ होकार देत म्हणाले, 'हा दानाचा प्रसाद इथे प्रत्यक्ष होईल ज्ञानराया तुझ्या मागण्याप्रमाणेच सर्व काही होईल' हे आपल्या गुरूंचे आश्वासक उद्गार ऐकून, हे वरदान-पसायदान प्राप्त झाल्याच्या आनंदात ज्ञानेश्वर महाराज सुखावले. आनंदित झाले शांत व समाधानी झाले.

'पसायदाना'सारखी अभूतपूर्व रचना करणारे, लोककल्याणाविषयी विलक्षण कळवळा असणारे, अखिल विश्वाच्या मंगल धारणेचे, विश्वोद्धाराचे भव्योदात्त स्वप्न पाहणारे संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर महाराज यांची थोरवी शब्दात वर्णन करणे शक्य आहे का? नाही. कारण ती शब्दातीत, शब्दात वर्णन करण्यापलिकडची आहे. ज्ञानेश्वर महाराज हे जसे लोकोत्तर संतपुरूष तसाच त्यांचा 'ज्ञानेश्वरी' हा लोकोत्तर ग्रंथराज. त्यांची साक्षात् 'वाङ्मयी मूर्ती'च ! ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या निर्मितीमुळेच ते आज ग्रंथरूपाने अमर झाले आहेत. संत नामदेवांनी म्हटलेच आहे की, ''नामा म्हणे श्रेष्ठ । ग्रंथ ज्ञानेश्वरी । एकतरी ओवी । अनुभवावी ।।'' आपण यापेक्षा अधिक काय म्हणणार?

अखेर सर्वांना एकच प्रार्थना, एकच आवाहन की प्रत्येकाने ज्ञानेश्वरांच्या पसायदानाच्या संदर्भात आपल्या मनाशी खूणगाठ बांधावी, मन:पटलावर काही गोष्टी कोरून ठेवाव्यात की पसायदान हा मराठी भाषेचा अनमोल असा अलंकार आहे, अवघ्या नऊ ओव्यांचा नवरत्नांचा हार आहे, पसायदान हा मराठी संस्कृतीचा ठेवा आहे. ते महाराष्ट्राचे राष्ट्रगीत आहे. ते विश्वकल्याणाचे ध्येय सांगणारे विश्वगीत आहे, ती साक्षात् संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांची अमर अशी वाङ्मयीमूर्ती आहे. निवृत्तिनाथादी संत सज्जनांचे-ईश्वरनिष्ठांचे ते हृद्गत आहे. तो विश्वकल्याणाचा महामंत्र आहे. या गोष्टींचा आपणास कधीही विसर पडू नये आणि त्या ध्येय सिद्धीच्या मार्गाने आपली सतत वाटचाल व्हावी ही इच्छा!

- क्रांतिसेन रामचंद्र आठवले, पुणे
भ्रमणध्वनी : ९८६९९४१६९१

मध्यमवर्गीयांसाठी डिलक्स सहली
राजगुरू टुर्स
जिव्हाळा जपणारी माणसं

| | | | |
|---|---|---|---|
| केरळ बॅकवॉटर्स | AC | ९ दि. | 11,975/- |
| केरळ-कन्याकुमारी | AC | ११ दि. | 15,375/- |
| राजस्थान - मेवाड | | १० दि. | 13,475/- |
| सोमनाथ -द्वारका-गिरनार | | ७ दि. | 7,775/- |
| स्पेशल मध्यप्रदेश (कान्हा, पंचमढी, खजुराहोसह) | | १३ दि. | 18,975/- |
| इंदौर-उज्जैन-मांडू | | ६ दि. | 7,275/- |
| अंदमान | | (+रेल्वे + विमान) | 13,475/- |

★ सिंगापूर-बँकॉक ★ मॉरिशस ★ श्रीलंका

स्टेट बँक स्टाफ व पेन्शनर्सना रू.५००/-प्रत्येकी सवलत

मुंबई : 022 - 2431 8082 / 2438 1026
संपर्क : राजन पाडलोसकर - 9322231216
www.rajgurutours.com

## प्रतिक्रिया

नेहमीप्रमाणेच 'संवाद'चा जुलै २०१० चा अंक वेळेवर मिळाला. मी आतुरतेने त्याची वाट पाहत असते. निरनिराळे लेख, कविता, बँकेविषयी मजकूर, कुणाचे अभिनंदन, अशा सर्व अंगांनी नटलेला 'संवाद' वाचायला खूप खूप आवडतो.

'संवाद'मधील संपादकीय वाचनीय असतेच. परंतु जुलै २०१० च्या 'संवाद'मधील संपादकीय खूप आवडलं. त्यातील 'आपलं जीवन, आयुष्य ही एक वारीच आहे.' हे वाक्य मला खूप आवडलं व खरोखर ते अगदी यथार्थ आहे. जीवनाबद्दल खूप काही यामध्ये लिहिलं आहे. याबद्दल मी श्री. प्रभाकर गुपचूप यांचे कौतुक व अभिनंदन करते. प्रथमदर्शनीच इतकं छान संपादकीय वाचल्यावर आतील मजकूर किती सुंदर व वाचनीय असेल याची कल्पना येते.

'संवाद' लेख स्पर्धेतील पुरुष विभागातील प्रथम पारितोषिक विजेता 'या सुखांनो या' हा श्री. श्रीपाद जोशी यांचा लेख खूप छान आहे. सुखाच्या वेगवेगळ्या कल्पना लेखात त्यांनी चांगल्याप्रकारे मांडल्या आहेत. याबद्दल श्री. जोशींचे अभिनंदन! स्त्री विभागातील प्रथम पारितोषिक विजेता, सौ. कल्पना गोखले यांचा 'या सुखांनो या' हा लेखही फार आवडला. '७ ते ८.३० लोड शेडिंगवेळी इनव्हर्टर असला तरी मी दिवे बंद ठेवते आणि बाल्कनीतल्या झुल्यावर बसून आठवणींचा अल्बम उघडते.' खूप छान वाक्य आहे. सौ. कल्पना गोखले यांचे या सुंदर लेखाबद्दल अभिनंदन! 'महिला आरक्षण आणि मी' हा श्री. मधुकर पालकर यांचा लेख सर्व पेन्शनरांनी आणि ज्येष्ठ नागरिकांनी वाचावा असा आहे. त्यांचेही अभिनंदन! 'संवाद'च्या संपादक मंडळालाही धन्यवाद.

– नीलिमा कुलकर्णी, पुणे

फोन – (०२०) २५४२०५४८

*****

'संवाद' जुलै २०१० चा अंक जुलै महिन्यातच मिळाला. बऱ्याच वेळा वाचून पाहिला. या अंकातील श्री. प्रभाकर गुपचूप यांनी संपादकीय सर्वोत्तम लिहिले आहे. वाचून मनापासून आनंद झाला. तसेच श्री. शरद महाबळ यांची चारोळी चांगली आहे. सौ. कल्पना कोठारे यांची 'रसिक' कविता छान वाटली. पी. एम. भगत यांची 'आभार' ही कविताही सुंदर आहे.

संपादक मंडळातील सभासदांना हार्दिक सदिच्छा!

– एस. एस. इंगळे नांदुरा (जि. बुलढाणा)

फो. ९६५७७१५३४७२

******

'संवाद'च्या अंकाची मी नेहमीच वाट पाहत असतो. अंक मिळताच उत्सुकतेने सर्व लेख व इतर माहिती वाचून काढतो. 'संवाद'मधील सगळे लेख, चुटके, कविता वाचून मला पुष्कळ आनंद मिळतो. जुलै २०१० 'संवाद'मधील 'महिला आरक्षण आणि मी' हा लेख मला खूप आवडला.

'संवाद'च्या छान आणि सुंदर प्रकाशनाबद्दल संपादक मंडळाला माझ्या हार्दिक शुभेच्छा!

– राजेंद्र एन. दवे, अहमदाबाद

(जनरल सेक्रेटरी, अहमदाबाद युनीट) मो. ९८९८०८८५४३

*****

## चतुर प्रवासी

मे महिन्यात एके दिवशी रत्नागिरी – कोल्हापूर धावणाऱ्या एसटी बसमध्ये खूप गर्दी होती. बरेच लोक गाडीत उभे राहूनही प्रवास करीत होते. त्यात मीही एक प्रवासी होतो. प्रवासादरम्यान साखरपा (जि. रत्नागिरी) या गावाच्या प्रवेश ठिकाणी चावडीसमोर बसस्टॉप आहे. तिथे बस थांबली. गाडीतून एक प्रवासी उतरला. स्टॉपवर उभा असलेला एकजण गाडीत शिरला. कंडक्टरने त्याला ''गाडीत जागा नाही, खाली उतरा'' असे खडसावले. प्रवासी म्हणाला, ''जागा नाही कशी? आत्ताच एकजण बसमधून उतरला आहे. तर एकासाठी जागा आहेच. मी उतरणार नाही. मी उभा राहून प्रवास करण्यास तयार आहे.'' दोघांच्याही प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण झाला. कंडक्टरने गाडी पोलीस आऊटपोस्टला आणली. तक्रार देण्यासाठी कंडक्टर पोलीसाकडे गेला. पोलीस आधीच काही कामात व्यस्त होता. त्याने कंडक्टरला पाच – दहा मिनिटे थांबण्यास सांगितले. विनाकारण खोळंबा झाल्यामुळे प्रवासी वैतागले होते. दहा मिनिटांनी कंडक्टर आणि पोलीस एस.टी.जवळ आले. गाडीमधील प्रवासी खो-खो हसू लागले. गाडीत प्रवासी का हसतायत ते कंडक्टरला आणि पोलीसाला कळेना. कंडक्टरला पोलीस विचारतो, ''तो वाद घालणारा प्रवासी (पॅसेंजर) कोण आहे?'' गाडीमधील एक जण बोलला, ''आत्ताच या गाडीमागून दुसरी एसटी आली. या गाडीतून उतरून मागच्या गाडीत बसून तो पुढच्या प्रवासाला गेलाही. तो म्हणत होता, ''कशाला कंडक्टरशी वाद आणि पोलीसाचा त्रास?'' कंडक्टरने मात्र पोलीसाच्या आणि गाडीतील प्रवाशांच्या फुकट शिव्या खाल्ल्या. असा होता तो चतुर प्रवासी !

– प्रभाकर कानिटकर, कोल्हापूर. फो. ९८८११९९१९९

हे लक्षात ठेवा
नोव्हेंबर २०१० मध्ये आपल्या पेन्शन पेईंग ब्रँचला जाऊन 'लाईफ सर्टिफिकेट' देण्यास विसरू नका.

## शब्द

अक्षर समूहास म्हणतात शब्द, अर्थपूर्ण शब्दांनी होतं वाक्य
रामायण, गीता, बायबल, महाभारत
ज्ञानेश्वरी, गाथा, कुराण, भागवत
वाक्यापोटीच जन्मले फक्त
शब्द नसते तर



पशू झाला असता मानव
धर्म, संस्कृती, कला, साहित्य
उगमाआधीच झाले असते नष्ट
शब्दाचं अस्तित्व नसतं तर
प्रेम, द्वेष, मैत्री, वैर
वात्सल्य, तिरस्कार, असूया, स्वार्थ
भावनाच झाल्या असत्या मृत
संगीत, नृत्य, नाट्य, चित्र
शिल्प, तंत्रज्ञान, बुद्धी, विज्ञान
औषधाला मिळाली नसती शोधून.
शब्द आहे जीवन
शब्द म्हणजे प्रगतीचा प्राण
म्हणूनच माणुसकी, कला, संस्कृती
धर्म नांदतात या जगात
विश्वात माणसाचं असणं नसणं
आहे चिरकाल, अबाधित
शब्दानंच, फक्त शब्दानंच.

**- आर.जी.कडवेकर**, सातारा
फोन नं. - २५१५७६

## आदर्श आचारसंहिता

युती करायची की आघाडी
की नुसतीच घ्यायची सबसिडी
पक्षबदल करावयाचा की व्हायचे सहयोगी
का निव्वळ व्हायचे दानयोगी
आश्वासने द्यायची असतात
जाहीरनामे विसरायचे असतात



लोकांचे प्रश्न सोडवायचे नसतात
प्रश्नांतून प्रश्न वाढवायचे असतात
परदेशी सहल काढू सरकारी खर्चाने
स्विस बँकेत पैसे ठेवू स्वहस्ताने
(अशा लोकांना पुढारी म्हणतात)

**- सिताराम तेरवाडकर**, सांगली

## चला लावू या हळद



रेखीव मेंदी रंगली हाती, नाजूकपर्णाची
चला लावू या हळद नवरीला, शुभशकुनाची ।।धृ।।

गौरकांति हिची उजळू या, पीत सुवर्णापरी
स्वतेजाने तळपत जाईल, ही अपुल्या घरी
आरोग्यसंपदा द्यावी संगे, रिवाज हा जुनाची
चला लावू या हळद नवरीला, शुभशकुनाची ।।१।।

सासू प्रेमळ जपेल तिजला, नित्य आईपरी
माय बाप तरीही व्याकुळ, निघता लेक सासरी
सोबत असावी माहेरची, कुणाची न कुणाची
म्हणून लावू या हळद नवरीला, शुभशकुनाची ।।२।।

माय कधी, बहीण कधी तर, कधी होईल सखी
स्पर्श मायेचा देईल ही, हळदची सारखी
दोन्ही कुळांचे नाव उजळो, लेक ही गुणांची
चला लावू या हळद नवरीला, शुभशकुनाची ।।धृ।।


**- सौ.ज्योती सूर्यकांत बागुल**, बोरीवली

## ते काम मदतनीस करेल.....



कॉलेजच्या एन.सी.सी.कँपवर एका देखण्या-स्मार्ट तरुण स्त्रीची नियुक्ति केली होती. तिचा मदतनीस म्हणून एका राकट-बलदंड-मिशाल-उग्र दिसणाऱ्या तरुण असिस्टंट कमांडंटची नेमणूक केली गेली. पहिल्याच दिवशी कमांडट मॅडमनी सर्व कॅडेटस् उद्देशून केलेल्या भाषणात सांगितले. मी शिस्तीची भोक्ति आहे. निर्भिडपणा स्पष्टवक्तेपणा मला आवडतो. कँपमध्ये आपल्याला कोणत्याही प्रकारे मदत हवी असेल, इथे दिलेल्या सोयी-सवलतीत आणखी काही हवं असेल तर जरूर सांगा. एवढं बोलून मॅडमनी सर्व कॅडेटस्वर आपली करडी नजर फिरवली. काहीच कुणी बोलत नव्हते. पीनड्रॉप शांतता झालेली बघून मॅडमनी पाठ फिरवून निघतात. इतक्यात एका वात्रट कॅडेटने बाकाकरवाली मुंडी घालून बायकी हळू आवाजात म्हटङं. ''आम्हाला एक गोड गोड पप्पी हवी.'' गर्रकन वळून मॅडमनी वर्गावर करारी नजर फिरवली अन् ज्या कोपऱ्यातून तो आवज आला तिकडे बोट दाखवीत आपल्या त्या सहकारी मदतनीसाला म्हणाल्या, ''त्यांना काय हवयं ते बघा अन् द्या.''

- मधु रानडे, नाशिक


October 2010 SAMVAD
State Bank of India
With you - all the way
Pure Banking. Nothing else.
While investing in a public issue...
...Mr. Sharma chose the old way
• Mr. Sharma applied for shares worth Rs.1,00,000/- but received an allotment worth Rs.10,000/-
• He will get his refund only after a month while losing interest on the entire amount of Rs.1,00,000/-
• Mr. Sharma is still waiting for the refund so that he can apply for another IPO
...Mr. Verma chose the SBI-ASBA way
• Mr. Verma applied for shares worth Rs.1,00,000/- and the amount remained in his SBI account continuing to earn interest
• His allotment of shares worth Rs.10,000/- happened within 15 days and the balance was unblocked immediately
• Mr. Verma has now applied for another IPO through SBI-ASBA
Time to opt for SBI's ASBA facility for your share applications and smile like Mr. Verma! All you have to do is visit the nearest SBI branch offering ASBA facility. SBI net banking customers can visit www.onlinesbi.com, click on the Demat / IPO link and proceed. Applying online is hassle free and needs no filling of application forms.
SBI ASBA
24x7 Helpline: 1800 11 22 11 (Toll free from BSNL / MTNL landlines) or
Email: contactcentre@sbi.co.in or visit www.sbi.co.in
THE BANKER TO EVERY INDIAN
CALL: Punjab & Chandigarh: 9779162211 • Haryana: 9996372211 • West UP & Uttarakhand: 9760202211 • Kolkata City: 9748422211 • Rest of West Bengal (except for Kolkata city), Sikkim & Andaman & Nicobar Islands: 9933202211 • Mumbai & Navi Mumbai City: 9987552211 • Goa & Maharashtra except Mumbai & Navi Mumbai City: 9730012211 • Madhya Pradesh & Chattisgarh: 9893282211 • Karnataka: 9731932211 • Chennai city: 9790942211 • Rest of Tamilnadu (except Chennai) & Pondicherry: 9791912211 • Delhi & National Capital Region: 9958802211 • Kerala & Lakshadweep: 9995302211 • Gujarat, Daman, Diu, Dadra & Nagar Haveli: 9724342211 • Andhra Pradesh: 9959192211 • UP East: 9793502211 • Orissa: 9777452211 • Bihar & Jharkhand: 9955952211 • Assam: 9957052211 • Rajasthan: 9799332211 • Himachal Pradesh: 9805092211 • Jammu & Kashmir: 9797532211 • Arunachal Pradesh, Tripura, Mizoram, Manipur, Nagaland & Meghalaya: 9862552211 (Local call charges applicable)
23

October 2010 SAMVAD

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008
License to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard PSO, Pune 37on 25th of each Month

## दिवसाचा पक्षी

दिवसाचा पक्षी टिपतो, सोनसकाळचे वाणे
पक्ष्यांच्या मधुर बोलीत, गातो सुस्वर गाणे
निळाईच्या डोहामध्ये, मनःपूत विहरतो
कधी मेघांच्या छायेखाली, अलगद स्थिरावतो
छायाप्रकाशाच्या खेळाचे, ते रूप गोजिरवाणे ॥१॥
ओलाचिंब भिजतो कधी तो, धुवाधार पर्जन्याने
आभाळाच्या वळचणीला, बसतो उदासपणाने
भिजलेल्या मनात शोधी, कवडसे बापुडवाणे ॥२॥
रोज बांधतो खूपशी तो, घरटी सुखदुःखाची
सायंकाळी पुसून टाकतो, नक्षी पुळणीवरची
मनामनांमध्ये आकांक्षांचे, काढतो चित्र देखणे ॥३॥
रात्रीच्या घरट्यात शिरून तो, अलगद विसावतो
हक्काच्या त्या विश्रांतीने, ताजातवाना होतो
सूर्याच्या हाकेने उडण्या, करतो पुन्हा बहाणे ॥४॥

- सौ.उज्वला इन्हांडकर, मुंबई

## लपंडाव

सूर्य दडे ढगाआड, लपंडाव हा कोणाशी ?
चंद्र हसे आकाशात, राज्य असे कोणावरती ?

उषा, निशा, संध्या, रजनी, जमल्या सगळ्या मैत्रिणी
खेळ लपंडावाचा मनी, परि भोज्या व्हावे कोणी ?

असा एकेकीचा पाय, दुसरीच्या पायात अडे
खेळताना लपंडाव, मैत्रिणीत हरवती गडे

हांसे सूर्य, हांसे चंद्र, पाहुनिया ती धडपड
मैत्रिणींचे परि मन, उरी काही धडधड

धडधड, गडगड, गडगड, गडगड
वाटते येणार पाऊस, सांगे भोज्या तो गर्जून !

- कल्पना कोठारे, सांताक्रुझ, मुंबई
दूरध्वनी : (०२०) २६१०४५५०

सूचना : १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वतः पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.
२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.
संपर्क दूरध्वनी क्र. (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

**If Undelivered Please Return to :**
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030. Phone : 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.



24